म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ओ॰वा॰
दा. क्र. 202

# साधु संत येती घरा

BVBK-0400202
BVBK-0400202

# श्री. शं. वा. दांडेकर यांचा अभिप्राय

प्रा. कृ. ज्ञा. भिंगारकर यांनी लिहिलेल्या 'साधुसंत येती घरा' या पुस्तकाचे दोन्ही भाग वाचून पाहिले. मला आवडले.

राष्ट्राच्या उन्नतिकरिता, समाजधारणा ज्यांच्या योगाने होईल अशा 'सत्य, अहिंसा, मानवता, सेवा, प्रेम, निःस्वार्थीपणा इत्यादि सद्‌गुणांचेमूल्य राष्ट्रातील बालमनावर बिंबवून त्यांची जोपासना करणे अवश्य आहे.

वर उल्लेखिलेल्या सद्‌गुणांचे महत्त्व बालमनावर बिंबविण्याकरिता ज्या वाङ्‌मयाचा उपयोग करता येईल त्यात संत चरित्रास फार मोठे स्थान आहे. कारण या साधुसंतांनी ही नैतिक, धार्मिक मूल्ये आपल्या जीवनात उतरवून ती खरी आहेत व मोलवान आहेत असे जगतास दाखविले आहे. या दृष्टिने प्रा. भिंगारकर यांच्या 'साधुसंत येती घरा' या पुस्तकाचा मोठा उपयोग आहे.

लेखकांनी निवड करताना मोठी व्यापक दृष्टी ठेवली आहे. भारतातील वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या ववेगवेगळ्या प्रांतांतून होऊन गेलेल्या संतांची निवड केल्यामुळे, जाणकारपणे, उपयोग केल्यास आपल्या राष्ट्राची 'एकात्मता' मुलांच्या मनावर शिक्षकास बिंबविता येईल. अशा शिक्षणाची देशास फार गरज आहे. हे दोन्ही भाग भारतीयसंस्कृती संरक्षणासमदत करतील असेच आहेत.

कथांची भाषा सोपी व सरळ आहे. त्या मनोरंजक रीतीने सांगितल्या आहेत. त्यामुळे मुलांना ही पुस्तके आवडतील अशी झाली आहेत.

पंढरपूर कर

आ. शु. १५ शके १८८

# लेखकाचे मनोगत

"साधु संत येती घरा" हे पुस्तक मुख्यतः कुमारांसाठी लिहिले आहे याच्या पहिल्या भागात उत्तर हिंदुस्तानातील सूर, तुलसी, मीरा इत्यादि संतांची चरित्रे आलेली आहेत व दुसऱ्या भागात दक्षिण हिंदुस्थानातील ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादी संतांची चरित्रे आलेली आहेत. ही सर्व चरित्रे साध्या व सोप्या भाषेत लिहिलेली आहेत. संतांच्या चरित्रातील गोष्टी सांगून शेवटी त्यांच्यां उपदेशाचे सार दिलेले आहे.

संतांची चरित्रे जुनी कधीच होत नाहीत. ती नित्य नवीनच असतात. आज जीवन निराशामय झालेले आहे. जीवनावरच्या श्रद्धा नष्ट होत चाललेल्या आहेत. सर्वत्र स्वार्थ, लाच-लुचपत, लोभ वगैरे दुर्गुणांचे व दुःखाचे वातावरण पसरले आहे. अशा वेळी संतचरित्रे म्हणजे जीवनाला मार्गदर्शत करणारा नंदादीप आहे. आज विद्यार्थ्यांच्या मनावर धार्मिक संस्कार करण्याच्या दृष्टीने देखील संत-चरित्रांचा उपयोग होणार आहे. या धार्मिक संस्कारांनी व श्रद्धांनी बऱ्याच समस्या आपोआप सुटतील. त्यासाठी प्रत्येक चरित्राच्या शेवटी त्या त्या संताचा उपदेश थोडक्यात दिला आहे. विद्यार्थ्यांनी हे दोन्ही भाग अवश्य वाचून आपले चारित्र्य घडवावे व सद्‌गुणांची जोपासना करावी.

संत कोणत्याही जातीत, कोणत्याही धर्मात, कोणत्याही देशात अथवा कोणत्याही कालात जन्माला आले तरी त्यांचा उपदेश सारखाच आहे. सत्य, अहिंसा, मानवता, सेवा, प्रेम, निःस्वार्थीपणा वगैरे मानवी सद्‌गुणांचा त्यांनी वारंवार उपदेश केला. त्या उपदेशाची संपूर्ण नाही, तरी थोडीशी ओळख करून द्यावी हा या पुस्तकाचा उद्देश आहे. त्यातून जिज्ञासू विद्यार्थ्यांनी त्या त्या संतांचे ग्रंथ मुळातून वाचावेत. अशा रीतीने गोष्टीरूपाने ज्ञान देण्याचा व संस्कार करण्याचा हा प्रयत्न आहे.

—लेखक

---

## अनुक्रमणिका


१. कपिलवस्तूचा राजकुमार
२. कुण्डनपूरचा राजपुत्र
३. एक अन्ध महाकवी
४. अमर काव्याचा कर्ता—तुलसी
५. एक अशिक्षित विद्वान्
६. महाकवी जायसी
७. कृष्णवेडी मीरा
८. वैष्णवांचा नेता—चैतन्य
९. नरसी मेहता
१०. शीख धर्माचा संस्थापक—नानक
११. विद्यापति
१२. रसखान

# १. कपिलवस्तूचा राजकुमार



**गौतमबुद्धाचे वनगमन**

आज आषाढी पौर्णिमेची रात्र होती. पिठासारखं शुभ्र चांदणं पडलं होतं. सारे कपिलवस्तू शहर चांदण्यात न्हाऊन निघत होते; सगळे लोक शान्त झोपले होते. कुठून तरी लांबूनच कुत्र्याच्या केकाटण्याचा आवाज फक्त येत होता. दास-दासी, पहारेकरी सर्व-

जण गाढ झोपलेहोते. सिद्धार्थाला मुलगा झाला. दिवसभर पुत्र-जन्माचा उत्सव चालला होता. त्यामुळे सर्वजण दमून शान्त झोपले होते. सिद्धार्थ उठला. यशोधरेच्या खोलीत आला. जायच्या आधी तिचा निरोप घ्यायचा होता त्याला. यशोधरा गाढ झोपली होती. आनंदाचे भाव तिच्या चेहऱ्यावर दिसत होते. शेजारीच नवीनच जन्माला आलेले बालक झोपले होते. किती निरागस आणि शान्त चेहरा होता त्याचा. सिद्धार्थाला वाटलं त्या बाल-काला घ्याव, त्याचा गोडसा पापा घ्यावा. पुन: केव्हा भेट होणार कोण जाणे ?– पण नको. या मोहात अडकायला नको. यशोधरे-जवळून त्याला उचलताना यशोधरा जागी झाली तर ? ती मला वनात जाऊ देणार नाही. मला वनात जायला पाहिजे. लोकांच्या दु:खावर उपाय शोधून काढायला पाहिजे. जगातून दु:ख नष्ट करायला पाहिजे. त्यासाठी मला हे सुख सोडायला पाहिजे.

**तीन दु:खद दृश्ये**

त्याला दोन दिवसापूर्वीचा प्रसंग आठवला. राजरस्त्यातून रथ चालला होता. एक महारोगी रस्त्यात तळमळत पडला होता. बोटं झडलेली होती. त्यातून रक्त गळत होतं. त्याने छन्न सार-थ्याला विचारले, "छन्न हे काय आहे?" छन्नूनं सांगितलं, "महा-राज, हा महारोगी आहे. मानवी जीवनात अशीच दु:ख येतात." सिद्धार्थ विचारात पडला. रथ काही अंतर चालून गेल्यावर एक म्हातारा काठी टेकत समोरून येत होता. पाठीला पूर्णपणे बाक आला होता. जवळ जवळ जमिनीकडे पहातच तो चालला होता. सिद्धार्थाने पुन: विचारले, "छन्नू, याची अशी अवस्था कशाने झाली रे?" छन्नू म्हणाला, "हे म्हातारपण आहे. प्रत्येकाच्या आयु-

ष्यात शेवटी ही अवस्था येते."– रथ पुढे धावू लागला. समोरून प्रेत चालले होते. सिद्धार्थाने सांगितले,छन्नू रथ थांबव. हे समोरून काय येतय?" छन्नूने सांगितलं, "महाराज हे प्रेत आहे. हा माणून मेला. याला जाळायला नेत आहेत.

"प्रत्येकाला मरण येतं ?" सिद्धार्थानं विचारलं.

"होय महाराज ! जो जन्माला येतो त्याला मरण हे येतच."

"म्हणजे मलाहि एक दिवस मरावं लागेल."

"हो"--

रथ पुढे धावू लागला.

**सिद्धार्थाचा गृहत्याग**

या तीन दृश्यांचा सिद्धार्थाच्या मनावर फार परिणाम झाला. सिद्धार्थ विचार करू लागला- "माणसाचे जीवन किती क्षुद्र आणि क्षणभंगुर आहे. त्याला अनेक दु:खांना तोंड द्यावं लागतं. त्याच्या आयुष्यात आजार आहेत. म्हातारपण आहे आणि शेवटी मृत्यूही आहे. याच्यातून त्याला सुटता येणार नाही का? या दु:खावर काही उपाय नाही का? आपण याचा उपाय शोधून काढला पाहिजे. त्याने त्यासाठी वनात जायचा निश्चय केला. एवढ्यात त्याला मुलगा झाल्याची बातमी कळली. संसाराचे आणखी एक बंधन वाढलं. त्या रात्री त्यानं वनात जाण्याचं ठरविलं. पण मोहातून उपाय निघत नव्हता. तो पुन्हा यशोधरेच्या खोलीत आला. समईची वात मोठी केली. त्या प्रकाशात त्याने पुन: एकदा यशोधरेकडे व मुलाकडे निरखून पाहिले, आणि नंतर मोहाची बंधने तोडून तो वनात निघाला. छन्नूनेच त्याला रथातून गावाबाहेर सोडले.

### जन्म व बालपण

सुखात आणि ऐश्वर्यात वाढलेला कपिलवस्तूचा राजकुमार जगाच्या कल्याणासाठीं रानात गेला. सगळ्या वैभवाचा एका क्षणात त्याग केला. लहानपणापासूनच त्याची विरक्त वृत्ती होती. कपिलवस्तूच्या शुद्धोदन राजाचा हा मुलगा. (जन्म इ. स. पू. ५८३) जन्मानंतर सात दिवसातच आई मायावती मृत्यू पावली. मावशी गौतमीने याचे लालनपालन केले. एका ज्योतिषाने सांगितले की, हा मुलगा पुढे झाला तर सार्वभौम राजा होईल नाहीतर जगाच्या कल्याणासाठी घर सोडून जाईल. एका मोठ्या धर्मपंथाचा संस्थापक होईल. सिद्धार्थ वनात जाऊ नये म्हणून राजाने सर्व प्रकारची काळजी घेतली. त्याला दुःखाचा वारा सुद्धा लागू दिला नाही. वयाच्या बावीस वर्षांपर्यंत त्याला दुःख म्हणजे काय याची कल्पनाही नव्हती, लहानपणीच राजाने त्याला युद्धविद्या, राजकारण वगैरे गोष्टीत प्रवीण केले. पण युद्धात लोकांना मारणे सिद्धार्थाला आवडत नसे. तो अतिशय हळुवार मनाचा होता. दुसऱ्याचे दुःख पाहून त्याच्या डोळ्याला टचकन् पाणी येई. विनाकारण निरपराध प्राण्यांची शिकार करणेही त्याला आवडत नसे.

### हा हंस माझा आहे

एकदा सकाळच्या वेळी तो सहज बागेत हिंडत होता. इतक्यात त्याला हंसाचा चीत्कार ऐकू आला. लगेच एक हंस त्याच्या समोरच येऊन पडला. त्याच्या शरीरात बाण घुसला होता, अंगातून रक्त येत होते. सिद्धार्थाचे मन कळवळले. त्याने हंसाला उचलले. त्याच्या शरीरातील बाण काढून टाकला व त्याला मलमपट्टी लावली. इतक्यात त्याचा चुलत भाऊ देवदत्त तेथे आला. तो

म्हणाला, "सिद्धार्था, हा हंस माझा आहे. मी त्याला बाण मारला. सिद्धार्थ त्याला म्हणाला, "हा हंस माझा आहे. तू त्याला बाणाने मारलेस. पण मी त्याचे प्राण वाचवलेत. मारणाऱ्यापेक्षा वाचविणाऱ्याचा हक्क अधिक पोचतो." भांडण वाढले. दोघेही ऐकेनात. शेवटी भांडण न्यायालयात गेले न्यायधीशाला पंचाईत पडली की, न्याय कोणाच्या बाजूने द्यायचा. दोघेही राजकुमार. शेवटी त्याने एक तोड काढली. न्यायाधीश म्हणाले, "आपण हंसाला मध्ये ठेवू. दोन्ही बाजूंना तुम्ही उभे रहा. ज्याच्याकडे हंस जाईल त्याचा हंस." दोघांनाही तोड मान्य झाली. दोघे हंसाला बोलावू लागले. हंसाने दोघाकडे पाहिले. चटकन् हंस सिद्धार्थाकडे वळला. कारण त्याने त्याचा प्राण वाचवला होता ना. हंस सिद्धार्थाचा झाला. लहानपणासून सिद्धार्थ हळवा व भावनाप्रधान होता. कोणालाही त्रास किंवा दुःख देऊ नये याकडे त्याची प्रवृत्ती होती. तो तासन् तास चिन्तनात घालवीत असे.

## दुःखांनी भरलेले जग

'सिद्धार्थाचं वागणं पाहून राजा घाबरला. त्याला वाटलं की, खरोखरच सिद्धार्थ विरक्त बनेल, घरदार सोडून जाईल. म्हणून त्याने त्याला संसारात गुंतवायचे ठरविले. देवदत्ताची बहीण यशोधरा हिच्याशी त्याचे लग्न करून दिले. यशोधरा रूपाने आणि गुणांनीं अतिशय चांगली होती. वर वर काही दिवस तरी सिद्धार्थाचे मन संसारात रमल्यासारखे राजाला वाटलं. पण आत विचारांचा ज्वालामुखी पेटला होता. सिद्धार्थाला एक मुलगा झाला. त्याचं नाव राहूल. शुद्धोदनाला वाटले की आता सिद्धार्थ संसारात रंगला, पण ते खरं नव्हतं. दिवा विझण्यापूर्वीं मोठा झाला होता. त्याच

सुमारास त्याला जगातील दु:खाचे दर्शन झाले होते. त्याने एकदा पाहिले होते--एक सरडा मुंग्या टिपीत होता. इतक्यात एक साप आला आणि त्याने सरड्याला खाऊन टाकले. त्याच वेळी आकाश-तून एक घार घिरट्या घालीत होती. तिनं चोचीत सापाला पकडले आणि वर नेले. तोच सण्ण् करीत एका शिकाऱ्याचा बाण घारीच्या छातीत घुसला. घार मेली. अशा रीतीने एक बळवान् प्राणी दुसऱ्या दुबळ्या प्राण्याला मारीत होता. नंतर एक दिवस त्याला एक महारोगी, एक म्हातारा आणि एक प्रेत दिसले. जगातील दु:खांची कल्पना आली. त्या दु:खांनी तो हैराण झाला आणि दु:ख नष्ट करण्यासाठी म्हणून सगळं राजवैभव, सुंदर बायको, नवीन जन्माला आलेला मुलगा सरळ सोडून तो वनात निघून गेला.

**जगाच्या कल्याणाची धडपड**

सिद्धार्थ काही दिवस आलारकालाम नामाच्या साधूच्या आश्रमात राहिला. तेथे त्याने योगाचा अभ्यास केला, एकाग्रता साधण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्याच्या मनाला समाधान मिळाले नाही. लोकांच्या कल्याणाचा मार्ग सापडला नाही. म्हणून त्याने आश्रम सोडला. भटकत भटकत तो ऊरुवेला नावाच्या रमणीय प्रदेशात आला. तेथे त्याने खडतर तपश्चर्या केली. प्राणायामाच्या आणि हठयोगाच्या अभ्यासाने त्याने शरीराबर पूर्ण ताबा मिळवला होता. पाच वर्षे त्याने तपस्या केली. ऊन, वारा, पाऊस यांचे आघात सोसले. देहदंड आणि उपासतापास यांनी त्याचे शरीर कृश आणि दुबळे बनले होते. तरी दु:खांतून सुटण्याचा मार्ग त्याला सापडला नाही. शेवटी तो निराश झाला. आपली तपस्या निष्फळ झाली म्हणून त्याला खंत वाटू लागली. काम, क्रोध, मोह

इत्यादि विकार वळावत असत. उपासाने तो इतका क्षीण झाला होता की त्याला एक पाऊलसुद्धा पुढे टाकवत नव्हते. चालता चालता तो मूर्च्छित होऊन पडला. त्याचवेळी सुजाता नावाची गवळण त्या ठिकाणी नवस फेडावयास आली होती. वनदेवताना नैवेद्य दाखविण्यासाठी तिने खीर खायला आणली. सिद्धार्थ मूर्च्छित पडलेला पाहून तिने त्याला खीर घातली. सिद्धार्थाच्या तेजस्वी चेहऱ्यामुळे तिच्या मनात आदर उत्पन्न झाला. त्याला नमस्कार करून ती निघून गेली. खीर पोटात गेल्यामुळे सिद्धार्थाला ताकद आली होती.

**ज्ञानाची प्राप्ती**

घर सोडून आज सात वर्षे झाली होती. आज वैशाख पौर्णिमेचा दिवस. सिद्धार्थाच्या आयुष्यातील भाग्याचा दिवस. रात्री बुद्धगया येथे बोधीवृक्षाखाली आत्मचिंतन करीत बसला असता त्याला ज्ञानाचा प्रकाश दिसला. त्याला ज्ञान झाले. सात वर्षांची तपस्या फळास आली. त्याला कळून चुकलं की माणसाची तृष्णा, वासना, अभिलाषा हेच खरं दुःखाचं मूळ आहे. अभिलाषा नष्ट केली की आपोआप माणूस दुःखमुक्त होईल. बोधीवृक्षाखाली हे ज्ञान त्याला झाले म्हणून त्याला "बुद्ध" म्हणतात. आता गौतमबुद्ध जगाच्या कल्याणासाठी बाहेर पडला.

**बौद्ध धर्माचा उपदेश व प्रसार**

नन्तर गौतम बुद्ध सारनाथ येथे गेला. तेथे त्याला पाच शिष्य मिळाले. हेच बुद्धधर्मातील पहिले पाच शिष्य होत. त्यांना त्याने आपल्या तत्त्वज्ञानाचा उपदेश केला. त्याने स्थापन केलेल्या धर्माला बौद्ध धर्म असे म्हणतात. याने आपल्या धर्मात अहिंसा व सत्य यांचा उपदेश केला. या धर्मात सदाचाराला फार महत्त्व देतात.

विशेषत: भिक्षूंच्या आचरणावर गौतम बुद्धाचा मोठा कटाक्ष असे. भिक्षूंच्या आचरणासंबंधी त्याने काही नियम घालून दिले. 'त्रिपिटक' या ग्रंथात या नियमांचा संग्रह केलेला आहे. गौतमबुद्धाने देशभर हिंडून आपल्या धर्माचा प्रसार केला. शेवटी कपिलवस्तू येथे येऊन त्याने आपल्या वडिलांना, यशोधरा व राहूल याना सुद्धा बौद्ध धर्माची दीक्षा दिली. वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत गौतम बुद्ध आपल्या धर्माचा प्रसार करीत होता. त्याच्या उपदेशाची भाषा साधी व सरळ असे. उपदेश करताना तो व्यवहारातील दृष्टान्त देई. अनेक राजे त्याचे शिष्य झाले. बुद्धानंतरही बौद्ध धर्माचा प्रसार खूपच झाला. सम्राट अशोक व सम्राट हर्षवर्धन या दोन सम्राटांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. त्यामुळे सहाजिकच प्रजेनेही बौद्ध धर्माचा स्वीकार केला. केवळ भारतातच नव्हे तर भारताच्या बाहेरही चीन, जपान, सिलोन या देशात बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता. अशोकाने आपला मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी सिलोनमध्ये पाठविले होते.

अशा रीतीने लोकांची दु:खे दूर करणारा, बौद्ध धर्माचीं स्थापना करणारा गौतम बुद्ध सर्व जगाला प्रेम, मैत्री आणि शांति याचा संदेश देऊन वयाच्या ८० या वर्षी कुशीनगर येथे निर्वाणास गेला.

----

# २. कुण्डनपूरचा राजपुत्र



**माजलेला हत्ती शांत झाला**

"कुमार थांबा ! थांबा ! जाऊ नका हत्ती फार माजला आहे. पुढे जाऊ नका." सगळ्या लोकांनी अडविण्याचा प्रयत्न केला. गच्चीवरून गम्मत पाहाणारा कुमार धावतच खाली आला. गजशाळेतील एक माजलेला हत्ती साखळ्या तोडून पळाला होता. राजरस्त्यावरून बेफामपणे धावत होता. कोणीहि त्याला आवरू शकत नव्हते. जो तो आपला जीव घेऊन घरात पळून जात होता. हे दृश्य गच्चीवरून कुमाराने पाहिले. जिन्यावरून तो धावतच खाली

आला. लोकांच्या अडविण्याकडे दुर्लक्ष करून तो राजपथावर आला. आणि माजलेल्या हत्तीसमोर उभा राहिला. प्रेमळ दृष्टीने हत्तीकडे पाहिले. आणि त्याला शांत राहण्याची खूण केली. आणि आश्चर्य असे की, कुमाराकडे पाहिल्या बरोबर माजलेला हत्ती एका क्षणात शांत झाला. सगळे लोक कुमाराच्या धाडसाचे कौतुक करू लागले.

**वर्धमानाचा जन्म**

कोण होता हा कुमार ? कुंडनपूरच्या सिद्धार्थाचा हा मुलगा. याच्या आईचे नाव त्रिशलादेवी. याच्या जन्मानंतर राज्याची भरभराट झाली. म्हणून याचे नाव वर्धमान असे ठेवले. वर्धमानाच्या जन्माच्या आधी त्रिशलादेवींला एक विचित्र स्वप्न पडले. स्वप्नात तिने चार दातांचा पांढरा हत्ती, कमळात बसलेली लक्ष्मी, पौर्णिमेचा चंद्र, मंदार पुष्पांचा हार, सोन्याचा कलश, प्रकाशमान अग्नि इत्यादि तेजस्वी वस्तू पाहिल्या. त्या स्वप्नाचा अर्थ ज्योतिषांनी असा लावला की, राणीसाहेबांच्या पोटी कोणी तरी महान् पुरुष जन्माला येणार आहे. त्याप्रमाणे इ. स. पू. ५९९ चैत्र शुद्ध त्रयोदशी सोमवारी सकाळी वर्धमानाचा जन्म झाला.

**संसारात राहून विरक्त**

वर्धमान लहानपणापासून धाडसी होता. त्याला भीति हा शब्द माहीत नव्हता. एकदा कुमार व त्याचे सोबती बागेत खेळत होते. इतक्यात एक साप बिळातून फुस् फुस् करीत बाहेर आला. सगळी मुले घाबरली व पळून जाऊ लागली. राजाचे शिपाईही कुमारला बाजूला ओढू लागले; पण कुमार ऐकेना. तो म्हणाला, "यात भ्यायच काय कारण ? तो साप मला काही करणार नाही." असे म्हणून त्याने सापाला अलगद हातात धरले आणि लांब

सोडून दिले. पण साप कुमाराला चावला नाही. या प्रकारामुळे लोक त्याला अवतारी पुरूष समजू लागले. वर्धमानाला नंदिवर्धन नावाचा थोरला भाऊ होता आणि सुदर्शना नावाची बहीण होती. त्याला लोकांचे अज्ञान आणि दुःख पाहून वाईट वाटे. आपण त्यांना दुःखमुक्त करायला पाहिजे असे त्याला वाटे. संसाराबद्दल त्याच्या मनात पहिल्यापासूनच विरक्ती-होती. पण आई–वडिलांना वाईट वाटेल म्हणून तो घर सोडून निघून गेला नाही. पुढे त्याचे लग्न वसंतपूरचा राजा समरवीर याच्या मुलीशी--यशोदेशी झाले. यशोदा सुशील आणि सुस्वभावी होती. वर्धमानासमोर सर्व प्रकारची सुखं हात जोडून उभी होती. तशात त्याला 'प्रियदर्शना' नांवाची मुलगी झाली. पण संसारात राहून सुद्धा त्याचे मन अनासक्त होते. केवळ ज्ञान (कैवल्यज्ञान) मिळविण्याची त्याला ओढ लागली होती.

**आत्मज्ञानासाठी गृहत्याग**

वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी त्याचे आई--वडील वारले. आता वर्धमानाचा मार्ग मोकळा झाला होता तो केवळ ज्ञानाच्या प्राप्तीसाठी वनात जाऊ शकत होता. त्याने थोरल्या भावाला नंदि-वर्धनाला जाऊ का? म्हणून विचारले. पण त्याला आपल्या भावाच्या विरहाची कल्पनासुद्धा सहन होईना. त्याने नकार दिला. वर्धमानाच्या सर्व इच्छांवर पाणी पडले. तो अधिकच खिन्न झाला. वर्धमान नाईलाजाने थोरल्या भावाच्या आग्रहास्तव घरी राहिला. पण तो उदास दिसू लागला. चेहरा नेहमी खिन्न असे. खाणे --पिणे कशातहि महावीराचे लक्ष लागेना. नेहमी तो चिन्तनात मग्न असे. शेवटी नंदिवर्धनाने त्याच्या मनाप्रमाणे वागायचे ठर-विले. त्याला वनात जायची परवानगी दिली. वर्धमानाने साधूची

दीक्षा घेतली. कुंडणपूर येथील ज्ञानशीला उद्यानात हा दीक्षा समारंभ झाला. वर्धमान जाणार म्हणून सगळ्या लोकांच्या डोळ्यात पाणी आले. वर्धमानाच्या चेहऱ्यावर मात्र एक प्रकारचे दैवी तेज विलसत होते. तो आज आनंदी दिसत होता. त्याने आपल्या सर्व संपत्तीचा त्याग केला. मऊ मऊ केस कापून टाकले. अंगावरील बहुमूल्य वस्त्रालंकार काढून ठेवले. आणि एक साधे वस्त्र नेसून वर्धमान निघाला. दीक्षा घेताना त्याने प्रतिज्ञा केली होती की, आजपासून उरलेल्या आयुष्यात मी कोणतेहि पाप करणार नाही, खोटे बोलणार नाही, कोणालाहि दुखवणार नाही. त्या दिवसापासून त्याने रात्रीचे जेवण सोडून दिले. आत्मज्ञान मिळण्यासाठी वर्धमानाने घर सोडले

**प्रचंड सहनशक्तीचा वर्धमान**

वनात त्याने बारा वर्षे तपश्चर्या केली. इंद्रियांवर जय मिळविला. कडक आचरणामुळे शरीर, वाणी, मन यावर अधिकार प्राप्त केला. तपश्चर्या करताना दुःखे सहन करण्याची ताकद प्रचंड होती. त्याच्या सहनशक्तीची एक गोष्ट सांगतात की, एकदा वर्धमान महावीर ध्यानाला बसले होते. निकडून एक गुराखी आला. त्याने आपले दोन बैल वर्धमानाजवळ सोडले आणि म्हणाला, "साधूमहाराज, माझे हे दोन बैल सांभाळा. मी चटकन् गावात जाऊन येतो." म्हणून गुराखी निघून गेला. महावीर वर्धमान ध्यानमग्न होते. त्यांनी गुराख्याचे शब्द ऐकले नाहीत. जरा वेळाने गुराखी आला. पाहतो तो बैल बरेच लांब गेले होते. तो साधूमहाराजावर चिडला आणि त्यांना मोठमोठ्याने हाका मारू लागला. "साधूमहाराज, उठा जागे व्हा. अहो माझे बैल कुठे आहेत? माझे बैल आणून द्या." पण सामहाधुराज कुठले जागे होतायत्. गुरा-

ख्याने खूप हाका मारल्या पण व्यर्थ. वर्धमान काही ध्यानातून उठले नाहीत. शेवटी गुराख्याने एक अणकुचीदार काडी घेतली आणि रागाने साधुमहाराजांच्या कानात खुपसली. महावीर वर्धमानाची समाधी खाडकन् उतरली. काडी कानात गेल्यामुळे खूपच वेदना झाल्या. कानातून रक्त येऊ लागले. पण महावीर गुराख्यावर रागावले नाहीत. त्याला त्यांनी एका शब्दानेही दुखविले नाही. कानातील रक्त पाहून गुराखी घाबरला. त्याने काडी बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. पण त्याला काही ती काडी बाहेर काढता येईना. शेवटी त्याने जवळच्या गावातील वैद्याला बोलावून आणले. वैद्याने आपल्या बारीक चिमटयाच्या साह्याने काडी बाहेर काढली. काडी बाहेर काढताना वर्धमानांना खूप वेदना झाल्या. कानातून रक्ताची धार गळत होती. पण त्यांनी हू की चू केले नाही. केवढी ही सहनशीलता ! त्यांची सहनशीलता पाहून गुराख्याला आणि वैद्यालाही आश्चर्य वाटले.

**आगीने पाय होरपळले**

सहनशीलतेचे आणखी एक उदाहरण सांगता येण्यासारखे आहे. एकदा एका जंगलात महावीर ध्यान करीत उभे होते. जवळच काही वंजारी लोक वस्तीकरिता आले होते. रात्री कडाक्याची थंडी पडली होती. म्हणून त्यांनी शेकोटया पेटविल्या. त्यातील ठिणगी महावीर वर्धमान ज्या ठिकाणी उभे होते, त्या ठिकाणी येऊन पडली. जवळपासचा भाग जळू लागला. आग महावीरांच्या जवळ येत होती. हे एका शिष्याने पाहिले. गुरुजींना सावध करण्यासाठी तो ओरडू लागला. पण त्याचे ओरडणे महावीरांच्या कानापर्यंत गेले. आत गेले नाही. महावीर ध्यानमग्न होते. त्यांना काहीच कळले नाही. शेवटी शिष्य ओरडून ओरडून दमला आणि आपला

जीव घेऊन पळून गेला. महावीरांचे ध्यान संपताच ते सावध झाले. पाहतात तो आगीने पाय होरपळले होते. केवढी ही सहनशीलता आणि एकाग्रता.

**सोनियाचा दिवस**

अशा रीतीने बारा वर्षें महावीरांनी तपश्चर्या केली. शरीरावर व मनावर काबू मिळविला. तेराव्या वर्षी त्यांच्या आयुष्यात "सोनियाचा दिवस" उजाडला. वैशाखशुद्ध दशमीचा दिवस होता. ऋजुबालिका नदीच्या तीरावर शाल वृक्षाच्या खाली महावीर आत्मचिंतन करीत बसले होते. अचानक त्यांना कैवल्यज्ञानाची प्राप्ती झाली. बारा वर्षांच्या खडतर तपश्चर्येला अमृतासारखे गोड फळ आले. संसारातील दु:खांतून मुक्त होण्याचा उपाय सापडला. देहदंडनाने शरीर जरी क्षीण झाले होते, तरी चेहऱ्यावर अलौकिक तेज झळकत होते. महावीर आता फक्त उपकाराकरिताच उरले होते.

**जैन धर्माचा उपदेश**

काम, क्रोध, मोह, मत्सर वगैरे विकारांना त्यांनी जिंकले म्हणून त्यांना "जिन" असे म्हणतात. त्यांच्या धर्माला "जैन धर्म" असे म्हणतात. ऋषभदेवांनी जैन संप्रदायाची खरी सुरुवात केली. महावीरांनी जैन संप्रदायाला तपस्येची तेजस्वी शिकवण दिली. जैन धर्माचा प्रसार केला. जैन लोक त्याला चोविसावा तीर्थंकर मानतात. लोकांना कळावे म्हणून त्यांनी आपला उपदेश संस्कृतमध्ये न करता लोकभाषेत केला. त्यांच्या उपदेशाचे सार पुढीलप्रमाणे होते—ते लोकांना सांगत, "चोरी करू नका. नेहमी खरे बोला. कोणत्याहि गोष्टीचा लोभ धरू नका. संग्रह करू नका सदाचाराने आणि पवित्रपणाने जीवन जगा. कळत किंवा न कळत.


कोणत्याहि प्राण्याची हिंसा करू नका. शरीराने, वाचेने आणि मनाने अहिंसा पाळा. १. आत्मजय, २. अहिंसा, ३. व्रत, ४. विनय, ५. शील, ६. मैत्री, ७ समभाव आणि ८. समाधान या आठ तत्वांवर त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाची उभारणी केली. या आठ तत्त्वांप्रमाणे वागणाऱ्या लोकांना "श्रमण" असे म्हणतात. यातील काही तत्त्वांचेच पालन करणाऱ्यांना "श्रावक" किंवा "उपासक" म्हणतात.

**धर्मप्रसार**

अशा रीतीने ३० वर्षे पायी प्रवास करून महावीरांनी आपल्या धर्माचा प्रसार केला. गुजराथमध्ये बरेच जैन आहेत. पालीठाणा, गिरनार आणि अबू येथे त्यांची मोठी तीर्थस्थाने आहेत. पुढे महावीरांची प्रकृती क्षीण होऊ लागली. त्यावेळी तें श्रावस्ती नगरीत रहात होते. वयाच्या ७२ व्या वर्षापर्यंत त्यांनी धर्मप्रसार केला. शेवटी कार्तिकी अमावास्येच्या मध्यरात्री श्रावस्ती येथे त्यांनी देह ठेवला ( इ. स. पू. ५२७ )–अहिंसेचा आणि आत्मजयाचा उपदेश करणारा हा महान् पुरुष परम ज्योतीत विलीन झाला.

---

# ३. एक अन्ध महाकवी



**दुष्काळात तेरावा महिना**

दिल्लीच्या जवळ सीही नावाच्या गावात एक सारस्वत ब्राह्मण राहात होता. घरात अठराविश्वे दारिद्र्य होते. त्याला तीन मुले होती. त्यांना एक वेळचे जेवणसुद्धा पोटभर मिळत नसे. तशातच त्याला चौथा मुलगा झाला. ब्राह्मणाला अतिशय वाईट वाटले. कारण तो मुलगा आंधळा होता. डोळ्यांची खोबणसुद्धा नव्हती. फक्त भुंवया दिसत होत्या. ब्राह्मणाला प्रश्न पडला की, याचे काम कोणी करायचं? त्याची काठी कोणी धरायची? हा नुसता बसून रहाणार. याला खायला कोणी घालायचे? घरात सगळे लोक त्याची हेळसांड करू लागले. कोणीही त्याच्याशी प्रेमाने वागेना. होता होता सूरदास सहा वर्षांचा झाला.

बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २०२
विषय किशोर क्र. ...9८

**माझ्या मोहरा कोठे आहेत ?**

एके दिवशी ब्राह्मणाला दोन मोहरा दान मिळाल्या. ब्राह्मण आनंदाने घरी आला. बायकोला म्हणाला, "बरे झाले. दोन चार महिने आपल्याला कशाची पंचाईत पडायची नाही." रात्री एका कोनाड्यात मोहरा ठेऊन तो झोपी गेला. सकाळी उठून बघतो तो कोनाड्यात मोहरा नाहीत. उंदराने मोहरा पळविल्या होत्या. ब्राह्मणाने दुःख करायला सुरुवात केली. तो रडू लागला. छाती पिटून घेऊ लागला. सूरदास म्हणाला, "बाबा, मी सांगतो तुमच्या मोहरा कुठे आहेत त्या. पण मोहरा सापडल्यावर एक क्षणभर मीं या गावात राहणार नाही. तुम्ही मला अडवता कामा नये." वडील म्हणाले, "ठीक आहे. माझ्या मोहरा सापडून दे. मी तुला अडवणार नाही." सूरदासाने जागा सांगितली. वडिलांना त्या ठिकाणी मोहरा सापडल्या. वडिलांना आनंद झाला. पण त्यावेळी आंधळा सूरदास हातात काठी घेऊन चालू लागला. वडिलांना वाटले की, सूरदासाला भविष्य कळते. आपला मुलगा चांगला आहे. ते म्हणाले, "या मोहरा संपेपर्यंत तरी तू राहा. नंतर निघून जा. नंतर आम्ही बोलवणार नाही. सूरदासाने ऐकले नाही. तो घराबाहेर पडला.

**तुमच्या गाई येथे आहेत.**

सीहीपासून चार मैलावर एका गावी सूरदास गेले. ते एका पिंपळाच्या झाडाखाली बसले होते. तिकडून एक जमीनदार आला. त्याने सूरदासाला ओळखले. तो म्हणाला, "माझ्या दहा गाई हरवल्या आहेत. त्या शोधून देणाऱ्याला मी दोन गाई बक्षीस देईन. सूरदास म्हणाले, "मला तुमच्या गाई नकोत, पण तुम्ही विचारता

म्हणून सांगतो की तुमच्या गाई या ठिकाणी आहेत. त्या ठिकाणी गाई सापडल्या. जमीनदाराच्या मनात सूरदासांबद्दल नितान्त आदर निर्माण झाला. त्याने त्यांना एक झोपडी बांधून दिली, त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था केली.

**गांव सोडले.**

हळूहळू त्या गावात सूरदासांची कीर्ती पसरली. गावातील लोक त्यांच्याकडे भविष्य विचारायला येऊ लागले. सूरदासांचे भविष्य खरे ठरत असे. त्यांना भरपूर पैसा, फळफळावळ इत्यादी मिळू लागले. पूर्वी झोपडी होती त्या ठिकाणी आता वाडा आला. बरीचशी शिष्यमंडळी भोवती जमली. एक दिवस सूरदासांच्या मनात विचार आला. आपण कशासाठी घरदार सोडले ? भगवान श्रीकृष्णाच्या भक्तीसाठी घरदार सोडले. पण पुन्हा आपण संसारात-या व्यापात सापडलो. या व्यापात सापडता कामा नये. असा विचार करून त्या रात्री सूरदासांनी ते गाव सोडले.

**दोन महापुरुषांची भेट.**

नंतर सूरदास आग्रा आणि मथुरा यांच्या मध्यभागी असणाऱ्या "गऊघाट" या ठिकाणी येऊन राहिले. त्या ठिकाणी ते श्रीकृष्णाची पदे गात असत. आवाज गोड असल्याने अनेक लोक पदे ऐकायला येत असत. येथेहि अनेक लोक त्यांचे शिष्य बनले. एके दिवशीं पुष्टिमार्गाचे प्रसिद्ध आचार्य वल्लभाचार्य अडेलहून व्रजला चालले होते. जाता जाता वाटेत गऊघाटाला उतरले. वल्लभाचार्यांच्या एका शिष्याने सूरदासांना ही बातमी सांगितली. वल्लभाचार्यांची कीर्ती ऐकल्यामुळे त्यांना भेटायची सूरदासांची इच्छा होती. जेवणखाण उरकल्यावर वल्लभचार्यांना भेटायला,

सूरदास आले. वल्लभाचार्यांनी सूरदासांना सांगितले, "सूरदास एखादे भगवंताचे पद म्हणा." सूरदासांनी पद गाइले.

'प्रभू हे सब पतितनि कौ टीकौ'

"परमेश्वरा, मी अतिशय पापी आहे. तुला शरण आलो. आता तूच माझं रक्षण कर," त्यांच्या पदातील दैन्यभाव पाहून वल्लभाचार्य म्हणाले, "स्वतः 'सूर' म्हणवतो आणि ऐवढे दैन्य का प्रकट करतोस? भगवंताच्या लीला गा."

सूरदास म्हणाले, "मला काहीच माहीत नाही, मी भगवंतांच्या लीला कशा वर्णन करणार?"

"जा—यमुनेमध्ये स्नान करून ये." वल्लभाचार्यांनी सांगितले. त्यांच्या सांगण्याप्रमाणे सूरदास स्नान करून आले. आचार्यांनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला. त्यांना गुरूपदेश दिला. पुष्टिमार्गाची दीक्षा दिली. आपले ज्ञान त्यांना दिले आणि सांगितले "सूरदास, आता गा भगवंताच्या लीला." आणि खरोखरीच सूरदासांनी कृष्णाच्या बाललीला गायला सुरुवात केली.

'सोभित कर नवनीत लिये।'

कृष्णलीलेचे पद ऐकून वल्लभाचार्यांचा आनंद गगनात मावेना. त्यांनी सूरदासांना आपले पट्टशिष्य केले. आपल्याबरोबर गोकुळ, गोवर्धन वगैरे ठिकाणी नेऊन कीर्तन करायला लावले. नंतर श्रीनाथजींच्या मंदिरातील कीर्तनाची व्यवस्था त्यांच्यावर सोपविली. पहाटे काकडआरतीपासून शेजारतीपर्यंतचे कार्यक्रम सूरदासावर सोपविले. प्रत्येक वेळी श्रीकृष्णासमोर कीर्तन करायचे. सूरदास रोज नवीन पदे रचून कीर्तन करीत असत.

**तुम्ही माझी स्तुती गा.**

त्यांच्या पदांची कीर्ती दूरवर पसरली. खुद्द तानसेन अकबराच्या

दरबारात सूरदासाची पदे गात असे. एकदा अकबराने तानसेनाला विचारले, "हे पद कोणी रचले ?" तानसेनाने सांगितले, "व्रजमध्ये राहणाऱ्या सूरदासांनी हे पद रचले." अकबराने सूरदासाला भेटायला बोलाविले आणि पद गायला सांगितले. सूरदासांनी कृष्णाच्या लीलांचे पद गाईले. पद ऐकून अकबर अत्यंत खूष झाला. सूरदासांची परीक्षा घेण्याच्या हेतूने अकबर म्हणाला, "सूरदास, तुम्ही भगवंताची स्तुती गाइली. राजा हा ईश्वराचाच अवतार. तुम्ही माझी स्तुती गा.' सूरदास म्हणाले 'राजा, माझ्या रोमरोमात भगवान् भरलेला आहे. श्रीकृष्णाशिवाय मी इतरांची स्तुती गाऊच शकत नाही. सूरदासांची कृष्णावरील भक्ती पाहून अकबर खूष झाला. पुढे अकबराने सूरदासांच्या पदांचे संकलन केले.

**श्रीकृष्णाच्या मूर्तीचे वर्णन**

सूरदासांची कृष्णावर अतिशय भक्ती होती. श्रीनाथजींच्या देवळात कृष्णाला रोज निरनिराळे पोशाख घालीत. सूरदास आंधळे होते तरी त्या पोशाखांचे वर्णन करीत. त्यांच्या ज्ञानचक्षूंसमोर मूर्ती उभी राहात असे. एके दिवशी लोकांनी त्यांची परीक्षा घेण्याचे ठरविले. त्या दिवशी कृष्णाला कोणताच पोशाख घातला नाही. फक्त मोत्यांच्या माळा घातल्या. लोक पहात होते की, सूरदास आता कसले वर्णन करतात. आंधळ्या सूरदासांचे कीर्तन सुरू झाले. त्यांनी पोशाख न घातलेल्या मूर्तीचे, तिच्या गळ्यात घातलेल्या माळांचे हुबेहूब वर्णन केले. तेव्हा मात्र लोक आश्चर्याने थक्क झाले.

**देवाच्या पूजेतील सोन्याची झारी**

सूरदासांच्या भक्तीमुळे कृष्ण त्यांच्या अंकित होता. त्यांच्या

अडचणीच्या वेळी धावून यायचा. एकदा एक प्रसंग घडला. सूरदासाच्या सेवेसाठी गोपाळ नावाचा एक मुलगा ठेवला होता. प्रसाद ग्रहण करण्याच्या वेळी सूरदास गोपाळला म्हणाले, "गोपाळ, पाण्याचा लोटा भरून ठेव." तो म्हणाला की, तुम्ही जेवायला सुरुवात करा, मी देतोच पाणी. म्हणून तो दुसऱ्या कामासाठी निघून गेला. तिथे दोन-चार वैष्णवांशी गप्पा मारण्याच्या नादात पाणी देण्याचे विसरून गेला. सूरदास जेवू लागले. जेवता जेवता घशात घास अडकला. त्यांचा प्राण घाबरा झाला. वरं, धड बोलताही येईना. तितक्यात त्यांच्या हातात कोणीतरी पाण्याची झारी आणून दिली. पाणी प्यायल्यावर सूरदासांना समाधान वाटले. तितक्यात इकडे गोपाळला पाण्याची आठवण झाली. तो धावत धावत आला. पण सूरदासांचे जेवण झालेले होते. गोपाळ म्हणाला, "महाराज आज आपण पाण्याशिवाय प्रसाद ग्रहण केलात?" सूरदास म्हणाले, "पाण्याशिवाय कसा ? तूच तर पाणी दिले होतेस." तो म्हणाला, "नाही. आज मी पाणी द्यायला विसरलो. मी आताच आलोय." सूरदासांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, "ती झारी कुठली ?" गोपाळने पाहिले तर देवाच्या पूजेतील सोन्याची झारी होती ती. त्याने सूरदासांना सांगितले. सूरदासांना वाईट वाटले. ते म्हणाले, "गोपाळ, उगीच माझ्या कृष्णाला त्रास दिलास! माझ्यासाठी तो भगवान श्रीकृष्णा सोन्याच्या झारीत पाणी घेऊन आला रे."

## सव्वा लक्ष पदे पूर्ण

सव्वा लक्ष पदे लिहिण्याचा सूरदासांचा संकल्प होता. पण लिहून मात्र एक लक्षच झाली. सूरदासांना कळून आले की, आता आपली जायची वेळ जवळ आली. सव्वा लक्ष पदे आपल्या हातून कशी

पुरी होणार ? रात्री श्रीकृष्ण स्वप्नात आले. त्यांनी सांगितले, "सूरदासा, काही काळजी करू नकोस. तुझी सव्वा लक्ष पदे झालेली आहेत." राहिलेली पदे देवाने लिहून ठेवली. दुसऱ्या दिवशी उठून पाहतात तो सव्वा लक्ष पदे लिहून तयार होती. इतके प्रेम होते देवाचे भक्तावर आणि भक्ताचे देवावर.

**श्रीकृष्णाच्या बाल–लीला**

सूरदासाने जन्मभर श्रीकृष्णाच्या बालस्वरूपाची भक्ती केली. त्याच्या बाललीला वर्णन केल्या. भागवताच्या कथेवर पदे रचली, पण त्यात दशम स्कधाचा विस्तार अधिक केला. त्यांनी सूरसागर सूरसारावली, साहित्यलहरी वगैरे ग्रंथ रचले. शृंगार आणि वात्सल्य या रसांची निर्मिती करणारा त्यांच्या तोडीचा कवी अद्याप हिंदी साहित्यात झाला नाही. हिंदीतील प्रसिद्ध टीकाकार आचार्य रामचंद्र शुक्ल त्यांच्याबद्दल लिहितात की, हिंदीत शृंगाराला "रसराज" पदवी कोणी दिली असेल तर ती सूरदासाने आणि वात्सल्यरसाचा तर ते कोपरान् कोपरा धुंडाळून आले. वात्सल्यरसात लिहिण्यासारखे त्यांनी इतर कवींना काही शिल्लक ठेवले नाही. इतर कवींची वात्सल्यरसाची पदे सूरदासांच्या पदांपुढे फिकी वाटतात. सरदास आंधळे असून सुद्धा लहान मुलांच्या आणि आईच्या भावना त्यांनी इतक्या सुंदर रंगवल्या आहेत की, डोळस कवी सुद्धा तशा रंगवू शकणार नाही. यशोदेच्या रूपाने आईच्या भावना त्यांनी किती सुंदर रंगवल्या आहेत पाहा. कोणत्या आईला वाटणार नाही की, आपला मुलगा लवकर मोठा व्हावा. त्याचे बोबडे बोल आपल्याला लवकर ऐकायला मिळावेत. त्याने आपल्याला "आई" म्हणूत हाक मारावी. यशोदेच्या मनात तीच इच्छा आहे. कृष्ण आई म्हणून हाक मारतो त्या वेळी तिच्या

आनंदाला सीमा उरत नाही.

" कहन लग मोहन मैया मैया ।
पिता नन्दसो बाबा बाबा अरु हलधरसो भैया ॥ "

लहान मुलांच्या स्वभावाचे वर्णन तर सूरदासांनी फारच सुंदर केलेले आहे. कृष्ण आणि बलराम खेळत असतात. बलराम कृष्णाला चिडवतो, " तू यशोदेचा मुलगाच नाहीस मुळी. अर्ध्या भाकरीवर आणि चतकोर कांद्यावर तुला विकत घेतला आहे. नाही तर नंद-बाबा गोरे, यशोदाही गोरी. मी गोरा आणि तूंच काळा कसा रे? तू यशोदेचा खरा मुलगाच नाहीस." कृष्ण रडत रडत आईकडे जातो आणि आईच्या कंबरेला मिठी मारून दादा चिडवतो म्हणून तक्रार करतो. शेवटी यशोदा त्याची समजूत घालते आणि शपथ घेऊन सांगते, " कृष्णा, बलराम काहीही म्हणाला तरी तू माझाच मुलगा आहेस."

" भैया मोहिं दाऊ बहुत खिझायो ।
मोसो कहत मोलको लीन्हो तुम जसुमति कब जायो ।
गोरे नंद जसोदा गोरी तुम कत स्याम सरीर ॥ "

एक का दोन अशी अनेक पदे आहेत, श्रीकृष्णाच्या खोड्या. दही-दुधाची चोरी, गोपींना त्रास देणे, गाई राखायला जाणे इत्यादी अनेक गोष्टींचे बहारदार वर्णन सूरदासांनी केले. ते वर्णन वाचून आपल्याला क्षणभर खरे वाटत नाही की, हे जन्मान्ध असणाऱ्या सूरदासांनी लिहिले.

**कृष्ण रूपात विलीन**

जेव्हा सूरदासांना कळले कीं आपला अन्तकाळ जवळ आला, तेव्हा ते परासौलीला गेले. वल्लभाचार्यांचे चिरंजीव विठ्ठलनाथ,

त्यांचे शिष्य व इतर लोक जमा झाले. तेथे सूरदासांनी शेवटचे पद गाईले. संवत १६४० मध्ये या प्रसिद्ध कृष्णभक्त कवीने परासौली येथे प्राण सोडला. जन्मान्ध असून देखील डोळसापेक्षाही सुन्दर काव्य रचणारा हा कवी अखेर कृष्णरूपात विलीन झाला.

सूरदासांच्या जन्ममृत्यूच्या काळाबाबत विद्वानांत अनेक मतभेद आहेत. पण त्यांच्या श्रेष्ठ अशा भक्तीबद्दल सर्वांच्यात एकमत आहे.

----

# ४. अमर काव्याचा कर्ता–तुलसी



### पेढे काढा पेढे

"अहो आत्मारामजी, पेढे काढा पेढे. तुम्हाला मुलगा झालाय्" लोकांनी पेढे मागितले. आत्माराम दुब्यांचा आनंद गगनात मावेना. आज वंशाला दिवा लागला. उशीरा का होईना मुलगा झाला.

"पण मुलाची आई अजून शुद्धीवर आली नाही. ताबडतोब वैद्याला बोलवा" सुईणीने येऊन सांगितले. आत्मारामजी घाबरले. घाईघाईने उपरणे सांवरीत वैद्याला बोलवायला गेले.

### अवलक्षणी रामबोला

संयुक्त प्रांतातील चांदा जिल्ह्यात राजापूर गावी इ. स. १५३३ मध्ये या बालकाचा जन्म झाला. वडिलांचे नाव आत्माराम दुबे

आणि आईचे नाव हुलसी होते. दोघेहि सात्त्विक आणि सदाचरणी होते. बऱ्याच काळाने पुत्र झाला, पण जन्मत:च मुलाची आई वारली. एका जोतिष्याने आत्माराम दुब्यांना सांगितले की, "मुलगा मूळ नक्षत्रावर जन्माला आला. आईबापांना आणि सगळ्या गावाच्या मूळावर आलेला आहे. याला टाकून द्या." पण आत्माराम दुब्यांचे पितृहृदय मुलाचा त्याग करायला धजेना. शेवटी लोकांनी जबरदस्तीने मुलाला सोडून द्यायचे ठरविले. सुईण आडून सगळे ऐकत होती. तिला वाटले की, खरोखरच लोक या लहान अजाण अर्भकाला सोडून द्यायला मागेपुढे पाहणार नाहीत. तिने गुपचूप मलाला आपल्या घरी नेऊन ठेवले. लोकांनी खूप शोधले, पण मुलगा सापडला नाही. मुलाचं नाव रामबोला ठेवले.

**रामबोलाचे हाल**

रामबोला सुईणीकडे दिवसेंदिवस वाढत होता. रामबोला चार वर्षांचा झाला. त्याच वेळी सुईणही वारली. लोकाना वाटलं हा मुलगा कुलक्षणी आहे. जो याचा सांभाळ करतो तो मरतो. सगळे लोक त्याची हेळसांड करू लागले. एका वृद्ध बाईस दया येऊन तिने त्याचा सांभाळ केला. पण लोक त्याला जवळ येऊ देत नसत. थोड्याच दिवसात ती वृद्ध बाईही मेली. रामबोला एकटा राहिला. आता तो खरोखर अनाथ झाला होता. दिवसभर हिंडायचा. दुपारी पोटाची आठवण व्हायची. रामबोला भीक मागत असे. पण कोणीही भीक द्यायचे नाही. कुलक्षणी, दळभद्र कार्टं म्हणून हाकलून देत. एखाद्या बाईला दया येऊन ती थोडे अन्न देत असे. अन्न पोटात गेलं की रामबोलाला बरं वाटत असे. रात्री झोपायला जागा नाही. थंडीचे कुडकुडत कुठे बसायचे ? रामबोला स्मशानात रात्र काढीत असे.

## रामा, मला या दु:खांतून सोडव

रामबोला आता आठ वर्षांचा झाला होता. त्याला समजू लागले होते. सगळे लोक आपला तिरस्कार करतात, आपल्याला भीक देत नाहीत, राहायला जागा देत नाहीत, म्हणून त्याला अतिशय वाईट वाटे. तो रामाची प्रार्थना करी, " रामा, मला जर इतके दु:ख द्यायचे होते तर जन्माला तरी कशाला घातलेस ? मला या दु:खातून सोडव."

## अरे हा तर रामबोला

आणि एके दिवशी अतिशय उदासीन झाला. निराश मन:-स्थितीत वैतागाने रामाच्या देवळात गेला. रामाची आरती चालली होती. अनेक निरांजने पाजळली होती. लोकांची गर्दी जमली होती. रामबोला पुढे आला. रामाच्या पायावर डोके आपटून म्हणू लागला, "रामा आता नाही रे सहन होत. या दु:खांतून सोडव मला." लोक आश्चर्याने बघू लागले. एक म्हणाला, " अरे, हा तर रामबाला. इथं कशाला आलाय्, द्या याला हाकलून." इतक्यात गर्दीतून एक भव्य मूर्ति पुढे आली.मस्तकावर जटा होत्या. छातीवर दाढी रुळत होती. चेहरा तेज:पुंज दिसत होता. ते नरहरीदास होते. ते पुढे आले त्यांनी विचारपूस केली. लोकांनी माहिती सांगितली, "अहो आपल्या आत्माराम दुब्यांचा हा मुलगा, रामबोला. जन्मत: आईला खाऊन टाकले."

## तू माझ्याजवळ राहशील ?

"म्हणजे हा ब्राह्मण आहे तर! काय ही ब्राह्मणाची दैना. याची

अजून मुंज झाली नाही. याच्यावर अजून संस्कार व्हावयाचेत. या मुसलमानांच्या राज्यात ब्राह्मण वणवण करीत भीक मागत हिंडत आहेत आणि शूद्र लोक धर्माचा उपदेश करतात." नरहरीदासांना अतिशय वाईट वाटले. बाळ, तू माझ्याजवळ राहशील का ? मी तुझी मुंज करीन. तुला विद्या शिकवीन.

**विद्याध्ययन**

"हो. मी राहीन तुमच्याजवळ." रामबोला आनंदाने कबूल झाला. नरहरीदासांनी त्याला तुलसीदलाने पवित्र करून घेतले. तेव्हापासून त्याचे नाव तुलसीदास पडले. नरहरीदासांनी त्याची मुंज केली. त्याला विद्या शिकवली. संपूर्ण रामकथा नरहरीदासांकडून तुलसीदासांनी ऐकली. तो तल्लीनतेने ऐकत असे. अनेक शंका विचारी. नरहरीदास त्यांचे समाधान करीत. तुलसीदासाची तल्लख बुद्धिमत्ता पाहून नरहरीदासांना आनंद वाटे. त्याला वेद शिकवायला म्हणून काशीला पाठवायचे ठरले. काशीला नरहरीदासांचे मित्र शेष सनातन रहात होते. मोठे गाढे पंडित होते ते. नरहरीदासांनी तुलसीदासांना शेष सनातनांच्या स्वाधीन केले. तुलसीदास वेद शिकू लागला.

वर्षामागून वर्षे जाऊ लागली. तुलसीदासांचे अध्ययन पूर्ण झाले. गुरुजींनी घरी जायला परवानगी दिली. तुलसीदासांनी विचारले, "महाराज, गुरुदक्षिणा काय देऊ ?"

"काही नको. तुझ्यासारख्या बुद्धिमान विद्यार्थ्याला शिकवायला मिळाले हीच माझी गुरुदक्षिणा."

"महाराज, काहीतरी सेवा सांगा" तुलसीदास म्हणाले.

"आता गृहस्थाश्रमाचा स्वीकार कर आणि धर्माचे रक्षण कर. धर्माची विस्कटलेली घडी नीट बसव," शेष सनातन म्हणाले.

"पण महाराज, गृहस्थाश्रम स्वीकारून धर्माचे रक्षण कसे करता येणार?"

"का? प्रभु रामचंद्रांनी नव्हता का गृहस्थाश्रम स्वीकारला? त्यांनीही धर्माचे रक्षण केले."

तुलसीदास निरुत्तर झाले. गुरूंची आज्ञा घेऊन ते पुन: आपल्या गावी आले.

**पुन: जन्मभूमी**

गांवातल्या लोकांनी ओळखले की, हाच तो आत्माराम दुब्यांचा कुलक्षणी मुलगा रामबोला. पण बोलणार कोण ? कारण आता रामबोला मोठा झाला होता. तो रामबोला राहिला नसून तुलसीदास झाला होता. त्याचे व्यक्तिमत्व रुबाबदार होते. चेहऱ्यावर विद्येचे तेज चमकत होते. डोळे अत्यंत तेजस्वी होते. संस्कृत विद्या जिभेवर नाचत होती. सायंकाळी देवळात तुलसीदासांनी रामकथा सांगितली. त्यांची गोड आणि रसाळ वाणी ऐकून श्रोते मंत्रमुग्ध होऊन गेले. त्यांचे संस्कृतवरचे प्रभुत्व, त्यांची विद्वत्ता पाहून लोक 'रामबोला' विसरले. त्यांच्या लक्षात फक्त तुलसीदास राहिले. गावोगावचे लोक तुलसीदासांची रामकथा ऐकायला येत आणि आनंदाने सद्गदित होऊन तुलसीदासांची स्तुती करीत निघून जात. ज्याच्या त्याच्या तोंडी तुलसीदासांचे नाव होते. त्या गावात तुलसीदासाला आदराचे स्थान प्राप्त झाले होते.

एके दिवशी सकाळी दीनबंधू पाठक त्यांच्याकडे आले. तुलसीदासांच्या विद्वत्तेने भारून गेलेल्या अनेक श्रोत्यांपैकी ते एक होते. त्यांनी सांगितले, "महाराज, एक विनंती आहे."

"काय ?"

" मी एक वस्तू आपल्याला दान करणार आहे. तिचा स्वीकार करावा. नाही म्हणू नका " दीनबंधू पाठक म्हणाले. तुलसीदासांना त्या वस्तूची काहीच कल्पना नसल्यामुळे ते म्हणाले, "ठीक आहे. अवश्य स्वीकार करीन."

दीनबंधू पाठकांनी आपल्या मुलीला-रत्नावलीला पुढे आणली. मग मात्र तुलसीदास चपापले. दीनबंधू पाठक म्हणाले, " महाराज आता विचार करू नका. आपण मला शब्द दिला आहे. हिचा स्वीकार करा. ही सद्गुणी आहे. सुस्वरूप आहे. संस्कृतचे सुद्धा बरेचसे अध्ययन हिचे झालेले आहे. ही कविताही करते. आपल्याला अनुरूप वधू आहे. म्हणून मी आपल्याला देतो. आपण नाकारू नका." तुलसीदासांनी शब्द दिला होता. म्हणून त्यांनी स्वीकार केला. तुलसीदास गृहस्थाश्रमी बनले.

**रत्नावली गुरू झाली**

रत्नावली अत्यंत सुंदर होती. साऱ्या जगातील लावण्य तिच्यावरून ओवाळून टाकावे असे तिचे रूप होते. तुलसीदास तिच्यावर फार प्रेम करीत. तिच्यावाचून त्यांना करमत नसे. अलीकडे तर त्यांचे पुजेतही लक्ष लागत नसे. संध्याकाळी रामकथा सांगताना ते पूर्वीइतके तन्मय होत नसत. एके दिवशी काही कामासाठी ते बाहेरगावी गेले होते. वडील येऊन रत्नावलीला माहेरी घेऊन गेले. चार पाच दिवसांनी काम उरकून तुलसीदास घरी आले. पाहतात तो रत्नावली नाही. ती माहेरी गेल्याची बातमी शेजाऱ्यांनी सांगितली. पण रत्नावलीशिवाय तुलसीदासांना चैन पडेना. ते सासुरवाडीस निघाले. मुसळधार पाऊस पडत होता. यमुना दुथडी भरून वाहात होती. मिट्ट अंधार होता. तुलसीदास यमुना पार करून आले. सर्व लोक शांत झोपले होते. तुलसीदासांना

पत्नीची खोली माहीत होती. त्या बाजूला ते गेले. काहीतरी खाली लोंबत होते. त्यांना वाटले की पहा-रत्नाचे आपल्यावर किती प्रेम आहे. आपल्याला वर येण्यासाठी तिने दोरच बांधला आहे. सरसर दोरावरून ते वर चढले. रत्ना दचकून जागी झाली. पाहते तो समोर पतिराज. तिने विचारले, "तुम्ही वर कसे आलात ?" तुलसीदास हसून म्हणाले, "वा ! आपणच वर येण्यासाठी सोय करायची अन् आपणच विचारायचे होय, तूच नव्हतास दोर बांधून ठेवलास माझ्यासाठी ?" रत्नावलीने खिडकीतून वाकून पाहिले. भला मोठा लांबलचक साप खिडकीला लोंबकळत होता. तिने सारे ओळखले. तिला अत्यंत वाईट वाटले. ती तुलसीदासांना म्हणाली, "तुम्ही किती प्रेम करता माझ्यावर. मला भेटण्यासाठी सापावरून चढून आलात, पण नाथ, हे प्रेम व्यर्थ आहे. याच्या निम्मे जरी प्रेम तुम्ही प्रभू रामचंद्रावर केले असते तर तुम्ही या भवसागरातून सुटला असतात." रत्नावलीच्या शब्दांनी तुलसी-दासांचे डोळे उघडले. ते म्हणाले, "रत्ना, आज तू माझी गुरू झालीस. बस्. आजपासून प्रभु रामचंद्राची सेवा करायची. त्याची भक्ती करायची." तुलसीदास त्याच पावली माघारी फिरले.

**देशाटन-ग्रंथरचना**

तुलसीदासांनी खूप प्रवास केला. त्यांनी समाजाचे खूप निरी-क्षण केले. काय दिसले त्यांना ? धर्माचे खरे स्वरूप नष्ट झाले होते. धर्माच्या नावाखाली ढोंगी लोक अनाचार माजवीत होते. निरनिराळे पंथ प्रभावी झाले होते. ब्राह्मणांनी आपला धर्म सोडला होता. शूद्र जागोजाग धर्माचा उपदेश करीत होते. जिकडे तिकडे ढोंग माजले होते. तुलसीदासांना वाईट वाटले. तुलसीदासांनी ठरविले, आपण लोकांना धर्माचे खरे स्वरूप सांगायचे. ते काशीला

येऊन राहिले. तेथे त्यांनी रामाज्ञाप्रश्न, रामगीतावली दोहारामायण, कवितावली, विनयपत्रिका, रामचरितमानस वगैरे ग्रंथ लिहिले. त्यांत 'रामचरित मानस' फारच प्रसिद्ध आहे. त्यांत त्यांनी आदर्श राज्याची–रामराज्याची कल्पना सांगितली आहे. रामकथा सांगता सांगता–राजाची व प्रजेची कर्तव्ये सांगितली आहेत. सत्यप्रीती, बंधुनिष्ठा, स्वामिभक्ती, मर्यादाशीलता वगैरे तत्त्वे मार्मिकतेने सांगितली. त्यांतील एक दोहा पहा.

"रघुकुल रीति सदा चली आयी
प्राण जाय बरू वचन न जायी ॥"

(रघुकुलातील रीतच मुळी अशी आहे की प्राण गेला तरी ते आपला शब्द मोडणार नाहीत.) या गुणामुळे 'रामचरितमानस' हिंदी साहित्यात श्रेष्ठ ठरले आणि तुलसीदासांना 'महाकवि'चे स्थान मिळाले. ज्याप्रमाणे महाराष्ट्रात घरोघर 'ज्ञानेश्वरी' आणि 'तुकारामाची गाथा' वाचतात, त्याप्रमाणे उत्तर हिंदुस्थानात असे एकही घर नसेल की ज्या घरी 'रामचरित मानस' वाचले जात नाही. शेवटी हा महात्मा एका दुर्धर व्याधीने पछाडला गेला आणि विक्रम संवत् १६८० मध्ये श्रावण शुद्ध सप्तमीला याने काशीमधल्या अस्सी घाटावर आपला देह ठेवला. तुलसीदास रामरूप झाले.

----

# ५. एक अशिक्षित विद्वान



## सापडलेला मुलगा

" अग, हे पाहिलेस का समोरून काय वाहात येतंय् ?" नीरू आपल्या बायकोला म्हणाला. नीमा दूरवर पहात म्हणाली, "हो, खरंच की, पेटीसारखं काही तरी दिसतंय्." सकाळची वेळ होती. काशीमधल्या एका तलावाच्या काठी दोघे पतिपत्नी सूत धूत होती. दोघेही कष्ट करून प्रामाणिकपणे पोट भरत असत. हळूहळू दूर-वर दिसणारी पेटी जवळ आली. उत्सुकतेने नीमाने ती ओढून काठावर आणली. तिने उघडून पाहिले तो आत एक लहान-गोंडस असे मूल होते. ते मूल कोणाचे? कोठून आले? आईने कां सोडले वगैरे काही माहीत नव्हते. दोघांनाही अतिशय आनंद झाला.

नीरू म्हणाला, "नीमा आपल्याला मुलगा नाही म्हणून, तुला वाईट वाटत होते ना? बघ. अल्लाने आपल्यासाठी मुलगा पाठविला आहे. अनाथ बालक दिसतंय्. याचा आपण सांभाळ करू. नीमाने त्या लहान मुलास हृदयाशी धरले." मातृवात्सल्याने तिला पान्हा फुटला. तिनं मुलाला घरी आणून पोटच्या पोराप्रमाणे संभाळले. याचे नाव कबीर. नीरू आणि नीमा ही साळी होती. म्हणून कबीराची जातही साळीच ठरली.

**काय रे मुसलमान मुलगा ना तू ?**

एका विणकराच्या घरी कबीर मोठा होत होता. लहानपणी वडिलांजवळ तो विणकामाचा धंदा शिकला. पण त्याच्या आवडीचा छंद मात्र वेगळाच होता. तो सारखे रामाचे भजन करी. विणताना सुद्धा तोंडाने रामनाम घेई. एकदा एका रामाच्या देवळात आरती चालली होती. रामाचे दर्शन घेण्यासाठी कबीर आंत जाऊ लागला. इतक्यात तिथल्या लोकांनी त्याला अडविले, "काय रे, मुसलमानाचा मुलगा ना तू आणि हिंदूच्या देवळात प्रवेश करतोस ?" कबीर हिरमुसला, तो दूर उभा राहून रामाची आरती पाहू लागला. त्याच्या मनात विचार येऊ लागले की जर सगळे जग परमेश्वराने निर्माण केले तर त्याच्याच देवळात हा हिंदु, हा मुसलमान असा भेद का? इतक्यात एक म्हातारा विणकर आला. त्याने कबिराच्या खांद्यावर हात ठेवला आणि विचारले, "कबीरा कसला विचार करतोस ?" कबीर म्हणाला, "काका, परमेश्वरानेच जर हिंदु व मुससमान दोन्हीं निर्माण केले तर त्याच्याच देवळात असा भेदभाव का ? मला हे देवळात का येऊ देत नाहीत ?" म्हातारा शांतपणे म्हणाला, "कबीरा हे असेच चालायचे. चल बावा, घरी चल.

वरीच रात्र झाली आहे. आई तुझी वाट पहात असेल." कबीर तेथून निघून गेला. पण विचार मात्र निघून गेले नाहीत.

**काम करताना रामनाम**

कबीराचे वय आणि रामभक्तीही वाढत होती. पुढे त्याचे लोई नावाच्या मुलीशी लग्न झाले. लोई स्वभावाने शांत व प्रेमळ होती. विणण्याच्या कामात ती कबीराला मदत करी. त्याच्या भक्तिमार्गातही तिने कधी अडथळा केला नाही. उलट मदतच केली. कबीर परमेश्वराची भक्ती करीत होता. पण त्याला आयते बसून खाणे आवडत नसे. तो कष्ट करून पोटाला मिळवी. परमेश्वराच्या नावाखाली साधू बनून त्याने कधी भीक मागितली नाही. शेले विणता विणता तो रामाचे नाव घेई. असे सांगतात की, त्याच्या शेल्यातून रामनामाचा ध्वनि कानावर पडत असे.

**शेला भिकाऱ्याला दिला**

कबीर दयाळू होता. गरिबांना मदत करण्यात त्याला आनंद वाटे. एकदा असाच आपल्याजवळील शेला घेऊन तो बाजारात गेला. एकीकडे नामस्मरण चालले होते. कबीर गिऱ्हाइकाची वाट पहात बसला. संध्याकाळी एक गरीब भिकारी आला. तो म्हणाला, "दादा, माझ्याजवळ काही नाही, मला काही तरी द्या." कबीराजवळ तरी द्यायला काय होते? एक मूल्यवान शेला मात्र होता. कबीर म्हणाला, "वा:! आज गिऱ्हाईक तर छान मिळाले!" असे म्हणून त्याने आपल्याजवळचा शेला भिकाऱ्याला देऊन टाकला.

**मसि कागज छुओ नही**

कबीर अशिक्षित होता. त्याला लिहतावाचता येत नव्हते; पण जिज्ञासा दांडगी होती. ज्ञानाची तळमळ होती. तो साधुसंतांच्या

संगतीत रहात असे. त्यांची कीर्तने ऐके. त्यांचे विचार समजून घेई. गावात कोणी फकीर आले, साधू, वैरागी, हठयोगी, नाथ-संप्रदायी आले तर कबीर त्यांच्याकडे जाई. त्यांच्या संगतीत राहून त्यांच्यापासून ज्ञान मिळवी. त्यांना आपल्या घरी बोलावून त्यांचा आदर सत्कार करी. त्यांनी सांगितलेल्या विचारांवर चिंतन करी. त्या चिंतनामुळे कबीराला त्यांच्या पंथांतील उणीवा कळून आल्या. परमेश्वराच्या स्वरूपाचे ज्ञान होऊ लागले. अशिक्षित असून सुद्धा सत्संगतीने ज्ञान मिळविले व काव्य रचले. कबीरदासच स्वतः कबल करतात, "मसि कागज छुओ नही कलम गह्यो नहीं हाथ ॥" पण चिंतन करता करता अनेक शंका येऊ लागल्या. मार्ग चुकू लागला. आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी गुरु मिळावा असे कबीरदासांना वाटू लागले. परमार्थात सद्गुरूची नेहमीच आवश्यकता लागते. परमार्थाची गुरुकिल्ली सद्गुरूच्या हातात असते. कबीरदास म्हणतात की, सद्गुरु व परमेश्वर दोघे माझ्यापुढे येऊन उभे राहिले तर प्रथम मी सद्गुरूचे पाय धरीन. कारण त्यांनीच मला परमेश्वर दाखविला.

"गुरु गोविंद दोऊ खडे काके लागौ पाय ।
बलिहारी गुरु आपने गोविंद दियो बताय् ॥"

**रामानंदाची भेट**

पण गुरु कोणाला करायचे ? काशीच्या रामानंद स्वामींची कीर्ती कबीराच्या कानावर आली होती. त्याने ठरविले की, रामानंदासारख्यांना आपण गुरू करावे. तो रामानंदाकडे गेला. पण रामानंदांनी त्याला दारातहि उभे केले नाही. ते म्हणाले, "तू मुसलमान आहेस. मी मुसलमानांना गुरूपदेश देत नाही." कबीर निराश होऊन परत गेला. पण मनातील निश्चय हा की,

गुरु करीन तर रामानंदानांच करीन. त्याला माहीत होते की, रामानंद पहाटे चारच्या सुमारास गंगेवर स्नानास जातात. दुसऱ्या दिवशी पहाटे घाटाच्या एका पायरीवर कबीर आडवा पडला. पहाटे टक् टक् खडावा वाजवीत रामानंद गंगेवर स्नानाला आले. मुखाने नामस्मरण चालले होते. पायऱ्या उतरताना त्यांचा पाय कबीराच्या डोक्याला लागला. चटकन ते म्हणाले, "राम, राम, कोण आहे येथे?" कबीराने त्यांना नमस्कार केला. कबीर म्हणाला "महाराज आपला शिष्य आहे. आपण "राम राम" म्हणाला हाच माझा मंत्र आणि हाच माझा गुरूपदेश. आजपासून मी आपला शिष्य झालो." कबीराची निष्ठा पाहून रामानंद आनंदित झाले. त्यांनी त्याला रामभक्तीचा उपदेश केला.

कबीराच्या घरी नेहमी साधुसंत, फकीर येत. कबीर कोणालाही विन्मुख पाठवीत नसे.

## स्वतंत्र विचारांचे कबीर

कबीर स्वतंत्र हे विचाराचे भोक्ते होते, त्यांना ढोंग अजिबात आवडत नसे. समाजांतील ढोंगांवर आणि बुवाबाजीवर त्यांनी सडकून टीका केली आहे. त्यांनी हिंदु-मुसलमानांतील भेद कमी करण्याचा प्रयत्न केला. दोन्ही धर्मातील ढोंगांवर त्यानी टीका केली व सांगितले की, यांतील कोणालाच खरा परमेश्वर कळला नाही. हिंदूंच्या कर्मकांडावर व जपजाप्यावर त्यांनी टीका केली. मूर्तिपूजेच्या बाबतीत कबीरदास म्हणतात की, जर दगडाची पूजा करून परमेश्वर मिळतो तर मी मोठ्या पर्वताची पूजा करीन. ज्या दगडाच्या जात्यामुळे आपल्याला पीठ खायला मिळते त्या जात्याची पूजा का करू नये?

पाहन पूज हरि मिलौ, तो मै पूजौं पहार
ताते ये चक्की भली, पीस खाय संसार।।

मुसलमानांच्या रूढीविरुद्धसुद्धा असेच कोरडे ओढले की, दिवसभर उपास करायचा आणि रात्री निरपराध गाय मारून खायची हा काय धर्म झाला ?

"दिनमे रोजा रखत है रात हनत है गाय।।"

कबीराने सांगितले की, खरा परमेश्वर मशिदीतही नाहीं आणि देवळातही नाही.

"ना मै देवल ना मैं मस्जिद ना काबा कैलासमें।"

कबीर कठोर टीकाकार होता. मुसलमानी धर्मावर टीका केलेली पाहून शिकंदर लोदीने त्याचा खूप छळ केला. त्याला हत्तीच्या पायी देण्याचा, आगीत जाळून टाकण्याचा प्रयत्न केला. पण कबीराला त्याचा काहीही त्रास झाला नाहीं.

**उपदेश**

कबीराने फक्त टीकाच केली नाही तर लोकांना उपदेशही केला. त्याच्या वाणीचा संग्रह 'बीजक' नावाने प्रसिद्ध आहे. 'रमैनी' 'सबद' आणि 'साखी' हे त्याचे तीन भाग आहेत. परोपकार करा. लोभ धरू नका. परमेश्वरावर एकनिष्ठ प्रेम करा. दिलेला शब्द पाळा वगैरे अनेक प्रकारचा उपदेश त्याने लोकांना केला. आजही कबीराच्या साक्या लोकांच्या जिभेवर नाचत आहेत. सुभाषिताप्रमाणे त्याचा उपयोग केला जात आहे. एक सुंदर साकी पहा–

"सांच बराबर तप नही झुठ बराबर पाप
जाके हिरदे सांच है, ता हिरदे गुरु आप।।"

सत्यासारखे तप नाही आणि असत्यासारखे पाप नाही. जो खरे बोलतो त्याच्या हृदयात सद्‌गुरु राहतो, परमेश्वर स्वतः राहतो.

**मग रामाचा मोठेपणा तो काय –**

कबिरांची चुकीच्या रूढीवर श्रद्धा नव्हती. मरताना सुद्धा त्यांनी हेच दाखवन दिले. त्या वेळी लोकांत अशी एक समजूत होती की, काशीत मेले म्हणजे स्वर्ग मिळतो, आणि 'मगहर' मध्ये मेले म्हणजे नरक मिळतो. ही समजूत खोटी आहे हे दाखविण्यासाठी कबीर मरण्यासाठी 'मगहर'ला गेले. ते म्हणाले," काशीत मेल्यावर जर मला स्वर्ग मिळाला तर रामाचा मोठेपणा काय राहिला? मगहरमध्ये मरून सुद्धा जर मला स्वर्ग मिळाला तरच रामाचा मोठेपणा आहे.

" जो कासी तन तजै कबीरा।
तौ रामहि कौन निहोरा ?"

असा हा महान् टीकाकार समाजाचे दुर्गुण घालवून त्याला सद्‌गुणांची शिकवण देणारा संत शके १४३९ मध्ये मगहरमध्ये मरण पावला. असे सांगतात की, याच्या प्रेताबद्दल हिंदु-मुसलमानांत भांडण जुंपले. पण प्रेतावरची चादर काढून बघतात तो अर्ध्या तुळशी आणि अर्धा सब्जा निघाला. मुसलमानांनी सब्जाचे दफन केले आणि हिंदूंनीं तुळशीचे दहन केले. हिंदू व मुसलमान दोघांनाही हा सारखाच प्रिय होता.

---

# ८. जायसी महाकवी



### शेरशहाचा दरबार

--शेरशहाचा दरबार भरला होता. शेरशहा सिहासनावर बसला होता. इतक्यात दरबारात एक व्यक्ती आली. दरबारातील सगळ्या सरदारांचे डोळे त्या व्यक्तीकडे वळले. कारण शेरशाह सुद्धा तिकडेच बघत होता. ती व्यक्ती पुढे येत होती. तोंडावर देवीचे व्रण होते. डोळा एकच होता. दुसऱ्या डोळ्याचा पत्ताच नव्हता. एका कानानेही कमी ऐकू येत होतं. असं ते कुरूप बेढब ध्यान पाहून शेरशहाला हसू आलं. दरबारांतील सरदारही हसू लागले. पण ती व्यक्ती चिडली नाही की रागावली नाही. तो बादशाहासमोर येऊन म्हाणाला, " जहापनाह, आपण मला हसताय का हे शरीर घडविणाऱ्या त्या कुंभाराला ( परमेश्वराला )

हसताय ?" हे उत्तर ऐकल्यावर मात्र सारा दरबार एकदम शांत झाला. बादशाह देखील खजील झाला आणि त्याने त्या व्यक्तीची क्षमा मागितली. ती व्यक्ती म्हणजेच महाकवी जायसी होय.

**महाकवी जायसी**

जायसी कुरूप होता पण त्याला आपल्या कुरूपतेची खंत वाटली नाही. तो म्हणत असे, " मला एकच डोळा आहे हे फार बरे आहे. बाहेरील एक डोळा नाहीसा झाला पण आतील डोळा (अंतश्चक्षू) उघडला गेला. कानाने कमी ऐकू येतय. जेवढं ऐकू येईल तेवढं मी हरीचे नाम ऐकेन." जायसी कुरूप होता तरी त्याचा आवाज अतिशय मधुर होता. त्याचे भजन गाणे ऐकायला लोकांचे कान आसुसलेले असत. हिंदीतील तो पहिल्या दर्जाचा कवी. 'पदमावत'-सारखं, हिंदीतील पहिल्या दर्जाचं महाकाव्य त्याने रचले. कवित्व शक्तीची अपूर्व देणगी मिळाल्यामुळे आपल्या कुरूपतेचे त्याला वाईट वाटत नसे. गोरेपान, सुंदर देखणे तरुण सुद्धा त्याचे काव्य ऐकून त्याच्या भजनी लागत.

**संत संगतीत बालपण**

हा जायस गांवात राहणारा म्हणून याला जायसी म्हणतात. जायस नगरातील कांचन भागात याचे आई-वडील राहात होते. याच्या वडिलांचे नाव मलिक शेख मनरेच किंवा मलिक राजे असरफ. लहानपणीच याचे आई-वडील वारले. तेव्हापासून हा साधूंच्या आणि फकीरांच्या संगतीत राहात असे. बालपणीच याच्या मनावर धार्मिक संस्कार झाले होते. काही विद्वानांच्या मते जायसी हा मूळ जायस नगरातील राहणारा नव्हता. पदमावतचा काही भाग लिहिल्यावर तो प्रवासास निघाला. जायसमध्ये आल्यावर तेथेच त्याचे मन रमले आणि पुढे आयुष्यभर तो जायसमध्येच राहिला.

जायसीचे लग्न झाले, तो शेतीचा व्यवसाय करून पोट भरत असे. दिवसभर शेती करावीं व रात्री परमेश्वराचे भजन–चिंतन करावे असा त्याचा दिनक्रम होता. पण परमेश्वराला त्याला साधा शेतकरी ठेवायचे नव्हते. शेती करण्याकरिता त्याचा जन्मच नव्हता मुळी. तो परमेश्वराकडे सेवेला गेला. दिवसेंदिवस परमेश्वराची ओढ जास्तच वाढू लागली. तशात सांसारिक आपत्ती आल्या. त्याला सहा मुलं झाली. मुले मोठी होती. पण एके दिवशी अचानक राहतं घर ढासळलं; आणि घराच्या छताखाली सहाच्या सहा मुले आणि बायको मेली. जायसीच्या मागे कोणी जिवंत नव्हते. जायसी एकटा राहिला. सगळी सांसारिक बंधने एका घावात तुटली गेली. आता कोणाकरिता संसार करायचा, कोणाकरिता मोहाच्या जाळ्यांत अडकायचं ? जायसी सारा दिवस परमेश्वर चिन्तनात घालवू लागला. दिवसभर शेतावर काम करता करता परमेश्वराचे चिन्तन चाले.

जायसीचा एक नेम होता. तो एकटा कधी जेवत नसे. जेवताना आपल्याबरोबर एखादा अतिथी घेऊन जेवायला बसत असे. एखाद्या वेळी कोणीच मिळाले नाही तर शेताच्या बांधावरून जाणाऱ्या माणसाला तो आपल्याबरोबर जेवायला बोलवीत असे. आजही तसेच झाले. दुपारच्या वेळी बैल सोडले आणि जेवायला बसणार इतक्यात त्याला खटकलं की अरे, आज आपण एकटेच अन्न खाणार ? ताबडतोब तो पानावरून उठला, अतिथी शोधण्यासाठी शेताच्या बांधावर येऊन उभा राहिला. इतक्यात समोरून एक म्हातारा काठी टेकत टेकत येतांना दिसला. सर्वांगावर कोड फुटलं होतं. कोडातून पू गळत होता. जायसीनं त्याला हाक मारली आणि आपल्याबरोबर जेवण करण्याची विनंती

केली. म्हातारा म्हणाला, "बाबारे, मला कशाला जेवायला बोलावतोस ? मी असा कुष्ठरोगी, अंगातून पू गळतोय; तू आपला एकटा जेव कसा." पण जायसीने आग्रह धरला. तो म्हणाला–"आपण कुष्ठ रोगी असला म्हणून काय झालं ? आपल्या ठिकाणी सुद्धा तो परमेश्वरच रहातोय ना ? मी अतिथी बरोबर घेतल्याशिवाय जेवत नाही. आपण जेवला नाहीत तर मलाही उपास घडेल. तेव्हा आपण माझ्याबरोबर जेवायला बसलेच पाहिजे." शेवटी तो म्हातारा आणि जायसी जेवण करू लागले. जेवता जेवता म्हाताऱ्याच्या कोडातून पू अन्नात गळला. जायसीने त्याच अन्नाचा घास घेतला आणि खाऊन टाकला, त्याला अजिबात किळस वाटली नाही. घास खाऊन समोर पहातो तो म्हातारा नाही. म्हातारा अदृश्य झाला होता. जायसीने ओळखले की स्वत: परमेवर कुष्ठ रोगी म्हाताऱ्याचं रूप घेऊन आला होता. किती मूर्ख आपण, परमेश्वराला ओळखू शकलो नाही. त्याला वाईट वाटलं, तो म्हणाला, "देवा, आज कुष्ठरोग्याच्या स्वरूपात मला दर्शन दिलंस, माझ्यासाठी एवढे कष्ट घेतलेस ! मी मात्र सामान्य अतिथीप्रमाणे तुला वागवलं. तुझं दर्शनही घेतलं नाही. जाता जाता मात्र तू प्रसाद दिलास."

जायसीने ठरवल की आता संसारात अडकायचं नाही. पूर्णपणे परमेश्वराला वाहून घ्यायचं. त्याला आता पूर्ण वैराग्य प्राप्त झालं होतं. घरदार, शेतीवाडी सारं काही विकून टाकलं, चार घरं भिक्षा मागून तो आपलं पोट भरीत असे. जातीनं मुसलमान असूनसुद्धा हिंदु धर्माबद्दल त्याला फार प्रेम वाटे. त्याने थोड्याच दिवसात पुराणे वगैरे हिंदूंच्या धार्मिक वाङ्मयाचा अभ्यास केला. अद्वैतवादाचा अभ्यास केला. हठयोगाचा अभ्यास सुरु केला. योग-

मार्गांत त्याने बरीच प्रगती केली. लोक त्याला सिद्ध फकीर म्हणून ओळखत असत. त्याच्या ज्ञानाचा आदर करीत. तोही लोकांच्या उपयोगी पडे. आपल्या योगाभ्यासाच्या बळावर त्याने लोकांचे रोग दूर केले. कित्येकांना संकटातून सोडविले. पण त्याच्या लक्षात आले की, सामान्य माणसाना ज्ञान, कर्म किंवा योग मार्गांने परमेश्वराजवळ जाता येणार नाही. त्यांना भक्तीमार्गच योग्य आहे. त्याने भक्तीचा-प्रेमाचा लोकांना उपदेश केला. प्रेमाने परमेश्वर प्रसन्न होतो असे त्याने सांगितले. तो सूफी संप्रदायाचा प्रतिनिधि–कवी होता. सूफ म्हणजे लोकर. जे लोक अगात पांढऱ्या लोकरीचा लांब अंगरखा, डोक्याला पगडी घालून दारोदार प्रचार करतात त्यांना सूफी म्हणतात. सुफी हे प्रेममार्गी आहेत. प्रेमाने परमेश्वर मिळतो अशी त्यांची श्रद्धा आहे.

ही गोष्ट लोकांना शिकविण्यासाठीच जायसीने "पदमावत" सारख्या महाकाव्याची रचना केली. पदमावत काव्याच्या दृष्टीने अतिशय सुलभ महाकाव्य आहे. त्यातील निसर्ग वर्णने वाचून लोक खूष होत. त्यातील विरहवर्णने तर रसिकांच्या अन्तःकरणाचा ठाव घेतात. त्यातील "बारहमासा" गाऊन फकीर भीक मागत असत. "बारहमासा" लोकात फार प्रिय होता. "बारहमासा" म्हणजे बारा महिन्यांचे वर्णन. बारा महिन्यात निसर्गांत होणारा बदल फार सुंदर रीतीने वर्णन केला आहे.

भाद्रपदाचे वर्णन पहा–

"भा भादों दूधर अति भारी, कैसे भौर रैनि बंधियारी
चमक बीसु, घन गरजि तराखा विरह काल होई जितु तरासा ।।"

( भाद्रपदातील सूर्याचे तेज अतिशय प्रखर आहे. रात्र अंधारी आहे. सूर्योदय होणार तरी केव्हा ? विजांचा कडकडाट आणि

ढगांचा गडगडाट यांनी जीव कसा हैराण झालाय. विरहाच्या वेळी तर फारच वेदना होतात. जीव व्याकुळ होतो.) – असंच नागमतीच्या विरहकाळांतील प्रत्येक महिन्याचं वर्णन कवीने केलेलं आहे.

एकदा अभेतीचा राजा रामसिंह महालाच्या खिडकीत उभा होता. खालून जायसीचा एक शिष्य बारहमासचा काही भाग गात भीक मागत चालला होता. तो रामसिंहाने ऐकला. त्याला त्या ओळी इतक्या आवडल्या की त्याने त्या फकिराला वर बोलाविले आणि विचारले. " साईजी या ओळी कोणी रचल्या आहेत? शिष्याने सांगितले, "आमचे गुरू जायसीयांनी रचलेल्या " पदमावत" महाकाव्यांतील हा बारहमासा आहे." ताबडतोब रामसिंहाने जायसीला बोलावून आणले आणि त्याचा सत्कार केला त्याला आपल्या दरबारात आश्रय दिला. भोजापूरचे महाराज जगनदेव आणि दिल्लीचा सुलतान शेरशाह यांचाही आश्रय जायसीला होता. असे सांगतात की, जायसीच्या आशीर्वादानें रामसिंहाला पुत्र झाला होता. त्यामुळे त्याची जायसीवर श्रद्धा अधिकच वाढली.

एकदा जायसीने रामसिंहाला सांगितले की, जंगलात शिकाऱ्याची गोळी लागून मला मृत्यु येणार आहे. रामसिंहाला फार काळजी वाटू लागली. आपल्या गुरूंना शिकाऱ्याच्या गोळीने मृत्यु येऊ नये म्हणून त्याने आसपासच्या जंगलात शिकार खे यला बंदी केली होती. जंगलावर पहारे बसविले होते. पण मानवी प्रयत्नांनी कधी विधिलिखित पालटता येतं का ? दुर्दैवाने एकदा एक शिकारी शिकार खेळता खेळता त्या जंगलात आला. त्याला माहीत होत की, या जंगलांत शिकार खेळायला राजाने बंदी केलेली आहे. तो तसाच पुढे जात होता. इतक्यात त्याला वाघाची कर्णकर्कश डरकाळी

ऐकू आली. तो घाबरला वाघापासून जीव वाचविण्यासाठी त्याने वाघावर गोळी झाडली. वाघ मरून पडला. पण जवळ जाऊन पाहतो तो तेथे वाघ नव्हता. जायसीचे मृत शरीर होते. छातीला गोळी लागली होती. रक्ताच्या थारोळ्यात महाकवी जायसी पडले होते. त्यांनी आपल्या मरणाबाबत सांगितलेले भविष्य खरे ठरले होते. रामसिंहाला फार वाईट वाटले. जेथे जायसी मेले त्या ठिकाणी रामसिंहाने समाधी बांधली. आजही अमेठी पासून पाऊण मैलावर ही समाधी दाखवितात.

जायसीने तीन ग्रंथ लिहिले. पदमावत, अखरावट आणि आखरी कलाम. त्यांत पदमावत फार प्रसिद्ध आहे. पदमावतात रत्नसिंह आणि पद्मीनीची प्रेमकथा आहे. जायसीने या प्रेमकथेत आध्यात्मिक रूपक फारच सुंदर बसविले आहे. जायसी हा मुसलमान असूनसुद्धा हिंदूंच्या धार्मिक भावनांशी-पौराणिक कथांशी समरस झाला होता. हिंदूचीच प्रेमकथा घेऊन त्यावर त्याने महाकाव्य रचले. त्याला हिंदु संस्कृतीचा पेहराव चढविला. आध्यात्मिक अर्थाचा आत्मा त्यात ओतला. लौकिक प्रेमापासून त्याने आध्यात्मिक प्रेम दाखविले. सूफी लोक आत्म्याला पुरुष आणि परमात्म्याला स्त्री मानतात. त्या दोघांचे मीलन म्हणजे जीव–शिवाचे ऐक्य. जीव आणि ब्रह्माची मिळणी. या मार्गात माया अनेक अडचणी आणते. त्यातून पलिकडे जावे लागते. त्याला गुरूसारखा मार्गदर्शक मिळाला तरच आपण तेथपर्यंत पोचू शकतो नाहीतर परमेश्वराची प्राप्ती अशक्य आहे. सूफी संप्रदायात गुरूला फार महत्व दिलेले आहे. या साधना मार्गाचेच वर्णन "पदमावत" महाकाव्यात रूपकात्मक रीतीने केलेले आहे. काव्याच्या अखेरीस जायसीने रूपकाचा अर्थ स्पष्ट

केला. तो म्हणतो–

"तन चितउर मन राजा कीन्हा
हिय सिपट सुधि पदमीनी चीन्हा ॥ ..."

शरीर हाच चितोडचा किल्ला. मन हा तेथील राजा. हृदय म्हणजे सिंहल द्वीप. पद्मीनी म्हणजे बुद्धी किंवा प्रत्यक्ष चैतन्य-स्वरूप परमात्मा. मार्ग दाखविणारा सुवा म्हणजे गुरू, नागमती म्हणजे माया किंवा संसारजाल–अशा रीतीने पदमावत म्हणजे एक विशाल आध्यात्मिक रूपक आहे. बाहेरचा पेहराव मात्र आकर्षक प्रेमकथेचा आहे.

अशा रीतीने जातीने मुसलमान पण हृदयाने हिंदु असणारा हा महाकवी सन १५४९ मध्ये एका शिकाऱ्याच्या गोळीने मारला गेला.

• • •

# ७. कृष्णवेडी मीरा



**ही तर माझ्या गिरीधरलालाची इच्छा**

" अगं तुला रडायला काय झालं ? तू बोलत का नाहीस ? बोल ना ! रडतेस का ?" मीरा म्हणाली. दासीने हातातला पेला पुढे केला. दासीला रडू आवरेना. मीराने विचारले, " हे काय ?" दासी रडत रडतच म्हणाली, " विष !" ह्या दोनच अक्षरांत मीराला सर्व उमगलं. ती दासीला म्हणाली, "अग रडतेस का? ही तर माझ्या गिरीधरलालाची इच्छा दिसते. आण तो पेला इकडे. मीरेने दासीच्या हातातील पेला घेतला. तिने डोळे मिटले. परमेश्वराची प्रार्थना केली, " गिरिधारी माझी परीक्षा पाहतोस होय ? अरे, तू आणि मी काही वेगळे का आहो ?" असे म्हणून तिने पेला ओठास लावला. गिरिधरलालाचे तीर्थ समजून तो पेला रिकामा

केला. दासी पहात होती. मीरा कृष्णभजनात रंगून गेली होती. पण समोरची गिरिधरलालाची मूर्ती मात्र निळीकाळी पडली. होती. दासीने हे पाहिले. तिला अतिशय आनंद झाला. आणि नाचत-नाचतच ती गेली. मीराच्या सासुबाईंनी हा विषाचा पेला पाठविला होता. त्यांना मीरा नको होती त्यांना मीरा म्हणजे कुलाची अब्रू घालविणारी कुलबुडवी आणि कुलक्षयी वाटत होती. कृष्णाकरिता नाचणारी, आनंदाने बेहोष होणारी मीरा त्यांना नकोशी झाली होती. पण मीरा त्याला काय करणार? लहानपणींच तिच्या मनावर कृष्णभक्तीचे संस्कार झाले होते.

**बालपणी कृष्णभक्तीचे संस्कार**

मीरा ही राव दूदाजींची नात. त्यांचा मुलगा रत्नसिंह याच्या पोटी संवत् १५५९ मध्ये मीराचा जन्म झाला. कुडकी हे तिचे जन्मगाव. तिचे आजोबा राव दूदाजी हे विष्णूचे एकनिष्ठ भक्त. देवळात तासन् तास भजन करीत बसत असत. पायात चाळ बांधून रंगून जात. नामस्मरणात लहानगी मीना त्यांच्याजवळ बसत असे. त्यांचे भजन ऐके आणि नामस्मरणात रमून जाई लहापणापासूनच तिचा ओढा देवाकडे होता. तिचे खेळ सुद्धा असेच असत. ती एखादा चांगला दगड पाहून घेई. त्याची पूजाअर्चा करण्यात तासच्या तास घालवी, आणि उरलेला वेळ आजोबांच्या सहवासात घालवी. आई लहानपणीच वारली असल्यामुळे तिला आजोबांचा लळा जास्तच लागला. आजोबा तिच्यावर अतिशय प्रेम करीत, तिचे लाड पुरवीत. त्यांनी आईच्या प्रेमाची उणीव भरून काढली.

**ही मूर्ती मीरेला दे**

एकदा राव दूदाजीकडे एक साधू आला. त्याच्याकडे गिरिधरलालाची एक मूर्ती होती. मोठी सुंदर आणि देखणी मूर्ती होती ती. त्या

साधूचे मूर्तीवर अतिशय प्रेम. तासन् तास त्या मूर्तीचे ध्यान करीत तो बसत असे. मीराने ती मूर्ती पाहिली. तिला ती फारच आवडली. तिने साधूपाशी ती मूर्ती मागितली. साधू रोज 'हो हो' म्हणत असे. पण मूर्ती मात्र त्याने दिली नाही. एके दिवशी मूर्ती न देताच तो साधू निघून गेला. मीरा रडू लागली. तिने मूर्तीसाठीं हट्ट धरला. शेवटी राव दूदाजीने साधूला शोधण्यासाठी सैनिक पाठविले. इकडे त्या साधूला दृष्टान्त झाला. भगवान् श्रीकृष्णांनीं येऊन सांगितले, "तू या मूर्तीचा मोह सोड, ही मूर्ती मीरेला नेऊन दे. ती लहान आहे. मला तिचा हट्ट पुरविला पाहिजे. 'साधू स्वप्नातील आदेशाप्रमाणे मीराला मूर्ती द्यायला निघाला. वाटेत त्याला राव दूदाजीचे सैनिक भेटले. साधूने घरी येऊन मीराला मूर्ती दिली.

**कृष्णाच्या मूर्तीचा ध्यास**

मीराला ती मूर्ती फार आवडली होती. तीं तिच्या पूजाअर्चेत आणि ध्यानात दंग असे. सगळा दिवस तिचा या उद्योगात जाई. गिरीधरलालशिवाय तिला दुसरे काहीच सुचत नसे. खाताना पिताना झोपताना, तिच्या मनात गिरीधरलाल असे. त्याला तिने मनोमन पती वरले होते. मीरा लहान होती. त्यावेळी या गोष्टीचे कौतुक होत होते, पण ती मोठी झाल्यावर मात्र वडिलांना काळजी वाटू लागली की, या कृष्णवेडचा मीरेचे लग्न कसे होणार? ही संसार सुखाचा कसा करणार?

**माझे लग्न झालेले आहे**

लग्नाचा मोसम होता. दारावरून सजविलेल्या वराती जात असत. मीरा आणि मीराच्या मैत्रिणी वराती बघत बसत. एकदा एका मैत्रिणीने चेष्टेने विचारले, "मीरा, तुला सुद्धा असाच शूर,

सुंदर आणि श्रीमंत नवरा मिळणार आहे बघ. तुझीही अशीच हत्ती-वरून वरात निघेल."

"अग पण माझं लग्न झालेले आहे." मीरा म्हणाली.

"अन् ते कधी ? आम्हाला कसं माहित नाही मग ? " एका मैत्रिणीने विचारले.

"तुझ्या नवऱ्याच नाव काय ग ?" दुसरीने विचारले.

"गिरीधरलाल, मी गिरीधरलालाशीच लग्न लावले आहे" मीरेने सांगितले.

"हत् वेडे! अग, मूर्तीशी कुणी लग्न लावतं का ?" मैत्रिणी खदखदून हसू लागल्या. पण लहानपणाचा हा प्रसंगच मीराच्या आयुष्यात खरा ठरला. तन-मनाने तिने श्रीकृष्णाला वरले होते.

## सुखाचा संसार

हळूहळू मीरा मोठी होऊ लागली. राणा संगाचा थोरला मुलगा भोजराज याच्याशी मीराचा विवाह झाला. मीरा थाटामाटाने सासरी आली. पण गिरिधरलालाच्या मूर्तीला घेऊनच. सासरच्या लोकांना कृष्णभक्ति आवडत नव्हती. पण तिची हुशारी, रूप पाहून कोणी तिला बोलत नसे. सासूबाईही मनातल्या मनात जळत असत. पण मुलाचे बायकोवर अत्यंत प्रेम असल्याने त्या काहीही बोलत नसत. अशा रीतीने मीराचा प्रपंच आणि परमार्थ दोन्हीही सुखाने चालले होते. सासरीसुद्धा ती तासन् तास पूजाअर्चा आणि ध्यान करीत बसे. पण हे सुखही देवाला पाहवले नाही, थोड्याच काळात मीरा पतिसुखाला पारखी झाली. भोजराजा अकस्मात् मृत्यू पावला. पण संकटे कधी एकटी येत नाहीत. तीन चार वर्षात मीराबाईचे वडील रत्नसिंह युद्धात लढता लढता मेले.

आईचे सुख तर लहानपणापासून नव्हतं. नंतर काही दिवसांनी मीराबाईचा सासरा राणा संगही मरण पावला. अशा रीतीने मीराचे लौकीक पाश तुटत चालले. संसारातील आघातामुळे तिचे मन पूर्णपणे विरक्त झाले. तिचं सगळं लक्ष देवाकडे लागले. आता फक्त एकच आश्रय-गिरीधरलाल –जो तिनं मनोमन पती म्हणून वरला होता.

**मी कृष्णाची आणि कृष्ण माझा**

आता ती सतत कृष्णचिन्तन करू लागली. पायात चाळ बांधून नामस्मरण करू लागली. साधुसंतांच्या सहवासात आपला काळ कंठू लागली. लोकांच्या बोलण्याची भीति तिनं मनात बाळगली नाही. ती सर्वांना सांगायाची की मी तर कृष्णाशी लग्न केलय्.

" मैं तो सपनेमें परनी गोपाल
हाथी भी लायो, घोडा भी लायो
और लायो सुखपाल ॥ १ ॥

आता मला कृष्णाशिवाय दुसरं कोणी नाही. मी कृष्णाची आणि कृष्ण माझा.

" मेरे तो गिरिधर दूसरा न कोई
जाके सिर मोर मुकुट मेरो पति सोई ॥ "

लोक तिच्या प्रेमाची निंदा करीत. पण मीरा लोक–लज्जेची पर्वा करीत नसे. ती म्हणत असे–

" मैं तो सांवरेके रंग राची
सजि सिंगार बांध पग घुंघरू
लोक लाज तजि नाची ॥ "

एक कृष्ण मिळाल्यावर तिला सर्व मिळालं. दुनियेची पृथ्वी-

मोलाची दौलत त्याच्यापुढे फिकी होती. सर्व जगातील सुखे त्या सुखापुढे कवडीमोलाची होती. मीरा म्हणते–

"रामरतन धन पायो, मैया
मैं रामरतन धन पायो।"

अशा रीतीने मीरा कृष्णप्रेमात दंग असे. कृष्णाच्या सहवासाने सुखावत असे. कृष्णाच्या विरहाने दुखावत असे. कृष्ण–सुखाची आस करीत रात्र रात्र जागत असे. रात्रीची झोप कृष्णाची वाट पाहाण्यात नष्ट होई. "सखि मेरी नीद नसानी हो।"

आणि कृष्ण भेटला नाही म्हणजे तिची स्थिती वेड्यासारखी होई. कृष्णाच्या नावाचा जप करीत बेहोश होऊन पडे. पण या विरहाच्या दुःखाची कल्पना दुसऱ्या कुणाला कशी येणार?

"मेरा दर्द न जाने कोय!
घायलकी गति घायल जाने
दुजा न जाने कोय॥"

मीरा कृष्ण–विरहात तळमळत असे.

## मीरेचा छळ

पण ही अवस्था सासरच्या लोकांना आवडली नाही. त्यांना वाटले की, मीरा ढोंग करते. त्यांनी मीरेचा छळ केला. त्यांनी मीराला मारण्यासाठी विषाचा पेला पाठवला. पण त्याचं अमृत झालं. पेटाऱ्यातून नाग पाठविला. पण त्याचा शाळिग्राम झाला. काट्यांच्या शय्येवर झोपविले, पण मीरेला काही झाले नाही.

## तुलसीदासांचा सल्ला

अशी एक आख्यायिका सांगतात की, सासरच्या त्रासाला कंटाळून मीराबाईने संत तुलसीदासांना एक पत्र पाठविले. त्यात तिने

त्यांचा सल्ला विचारला होता की, अशा परिस्थितीत मी कसे वागावे ? संत तुलसीदासांनी उत्तर पाठविले.

" जाके प्रिय न राम वैदेही ।
तजिये ताहि कोटि बैरि सम
यद्यपि परम सनेही ।। "

तुलसीदासांनी सांगितले की, रामभक्तीच्या आड जो येत असेल तो कितीही जवळचा असला तरी त्याचा त्याग करावा. परमेश्वर-भक्ती ही श्रेष्ठ आहे. त्यासाठी सांसारिक बंधने तोडली पाहिजेत. शेवटी तिला सासरचा छळ असह्य झाला. काका वीरमदेवाच्या बोलावण्यावरून ती मेवाड सोडून मेडत्याला गेली. आपल्या माहेरी आली. माहेरी मात्र तिला मोकळेपणाने कृष्णाच्या भजनात रंगता येई. काका, चुलतभाऊ जयमल वगैरे सगळे तिचा आदर करीत.

**स्वतःला पुरुष म्हणविणारा हा दुसरा कोण ?**

काही दिवसांनी राजकारणात मेडत्यावर पडती बाजू आली. मीरेची दिनचर्या अव्यवस्थित होऊ लागली. भक्तीत व्यत्यय येऊ लागला मीरा आता पूर्णपणे विरक्त बनली होती. तत्काळ तिने सर्व बंधने तोडली आणि तीर्थयात्रेला निघाली. तिने मथुरा वृंदा-वन, द्वारका वगैरे कृष्णाची सर्व ठिकाणे पाहिली. वृंदावनमध्ये असतांना ती जीव गोस्वामी नावाच्या साधूला भेटायला गेली. शिष्याच्या हाती निरोप पाठविला. पण शिष्याने परत येऊन सांगि-तले, " आमचे स्वामीजी स्त्रियांची भेट घेत नाहीत. स्त्रियांच्या दर्शनाने चित्ताचा विभ्रम होतो असे म्हणतात." मीरेनेही शिष्या-बरोबर निरोप पाठविला. " म्हणजे तुम्ही अजून नारीकडे नारी या दृष्टीने पाहता तर ? मी समजत होते की, वृंदावनात फक्त

एकच पुरूष आहे आणि तो म्हणजे भगवान् श्रीकृष्ण आणि बाकी सर्व नारीं आहेत. पण स्वतःला पुरूष म्हणविणारा हा दुसरा कोण?" शिष्याने हा निरोप जीव गोस्वामींना सांगितला. मीरेच्या म्हणण्याचा भावार्थ त्यांना कळला. ते ताबडतोब मीरेला भेटायला बाहेर आले आणि तिच्या चरणांवर मस्तक ठेवले. ते म्हणाले, "मीराबाई, तुम्ही धन्य आहात. आम्ही अजूनही नारीकडे नारी या भावनेने पहातो."

## कृष्ण कृष्ण म्हणत मीरा कृष्णरूप झाली

नंतर मीरा द्वारकेत आली. रोज श्रीकृष्णापुढे भजन करणं, नाचणं-गाणं, त्याच्या चिन्तनात मग्न होणं हाच तिचा दिनक्रम असे. तिनं भक्तिसारपूर्ण अनेक पदे रचली. तिच्या भक्तीची कीर्ती गावोगावी पसरली आणि गावोगावचे लोक तिच्या दर्शनासाठी येत. लोक तिला राधेचा अवतार समजत, जन्मभर प्रेमात डुंबत राहणारी मीरा संवत् १६३० च्या आसपास एक दिवस प्रियतम कृष्णाला भेटण्यासाठी निघून गेली. कृष्णरूपात विलीन झाली. विरहाच्या अंधाऱ्या रात्री आता संपल्या. आता कृष्ण आणि ती एकरूप झाली. कृष्ण कृष्ण म्हणत मीरा कृष्णरूप झाली.

• • •

# ८. वैष्णवांचा नेता-चैतन्य



**भिकेचे डोहाळे !**

"अन्न वाढा हो माई......" भिकाऱ्याची हाक कानावर आली. त्या वेळी शचीदेवी स्वैंपाकघरात स्वयंपाक करण्यात गुंतली होती. कोणीतरी भिक्षेकरी आला आहे म्हणून ती भिक्षा वाढण्यासाठी बाहेर आली. पण पहाते तो स्वतःचा मुलगा निमाईच होता. ती चिडली आणि म्हणाली, "काय रे, भिकाऱ्याचे खेळ खेळतोस्. तुला हे काय भिकेचे डोहाळे आठवलेत्" निमाई म्हणाला, "आई, तू अशी चिडतेस का ? ब्राह्मणांच्या अज्ञानी आणि मूर्ख मुलाला भीक मागण्यावाचून दुसरे काय साधन आहे ? "–शचीदेवी चम-

कली. मुलाच्या बोलण्यातील आशय तिने ओळखला. तिने इतर मुलांना खाऊ देऊन घरी पाठविले. त्याला जवळ घेऊन आई म्हणाली, "बाळ तू काळजी करू नकोस. उद्यापासून तू शिकायला जात जा मी यांची समजूत घालते."

**जन्म व बालपण**

निमाई हा हुशार व तल्लख बुद्धीचा होता. जगन्नाथ मिश्रांनी मुद्दामच निमाईचे शिक्षण बंद केले. बंगालमध्यें नवद्वीप (नदिया) नावाच्या लहानशा गावात जगन्नाथ मिश्र आणि शचीदेवी रहात असत. त्यांना इ. स. १४८५ मध्ये एक मुलगा झाला. त्याचं नांव विश्वंभर शचीदेवींची मुले जगत नसत म्हणून विश्वंभरलाच "निमाई" (अल्पायू) नावाने हाक मारीत असत. तो रंगाने गोरा-पान असल्यामुळे त्याला गौरांग असेहि म्हणत. निमाई मोठा होऊ लागला. त्याच वेळी त्याचा थोरला भाऊ विश्वरूप गृहत्याग करून संन्यास घेण्यासाठी निघून गेला. विश्वरूप हा जगन्नाथांचा थोरला मुलगा.अतिशय बुद्धिमान् व चलाख होता. त्यामुळे जगन्नाथ मिश्रांचा त्याच्यावर फार जीव होता. थोड्याच अवकाशात वेदान्त, न्याय, सांख्य यांच्यावर त्याने प्रभुत्व मिळविले. पण ज्ञानाचा परिणाम उलट झाला. त्याचे संसाराकडील लक्ष कमी झाले व विरक्त होऊन संन्यास घेण्यासाठी तो निघून गेला. जगन्नाथ मिश्रांना अतिशय दुःख झालं. ते नेहमी उदास आणि खिन्न राहू लागले. वडिलांचे दुःख पाहून निमाईचा खोडकर स्वभाव बदलला. तो शांतपणे वागू लागला. नियमितपणे अभ्यास करू लागला. जगन्नाथ मिश्रांनी हे पाहिले. ते स्वतः गाढे पंडित होते. पण त्यांनी पाहिले की, विश्व-रूपाला सगळे शिकवले आणि तो विरक्त बनून संन्यास घ्यायला निघून गेला निमाई बुद्धिमान् आहे. त्याला नुसती अक्षर ओळख

व्हायचा अवकाश, तो भराभर सगळे शिकत जाईल. आणि मग विश्वरूपाप्रमाणेच निमाई सुद्धा आपल्याला सोडून जाईल. मग म्हातारपणी आपल्याला पाणी द्यायलासुद्धा कोणी राहणार नाही. त्यांनी ठरविले की, बस् निमाईला शिक्षण द्यायचे नाही. त्यांनी निमाईला बोलावून सांगितले, " निमाई उद्यापासून तुझे शिक्षण बंद!" निमाई निराश झाला. त्याला कारण कळले नाही. बरं वडिलांच्या पुढे विचारण्याची प्राज्ञा नव्हती. शचीराणीलाही हे आवडले नाही. पण नवऱ्यापुढे ती काय बोलणार ? निमाईचं शिक्षण बंद झालं.

**खोडकर निमाई**

निमाई खोडकर आणि व्रात्य होता, तितकाच बुद्धिमान्ही होता. थोरला भाऊ घर सोडून गेल्यापासून त्याने आपल्या खोडकरपणाला आळा घातला. पण शिक्षण बंद केल्यामुळे नवीन नवीन खोड्या शोधून काढण्यात तो आपले डोके चालवू लागला. नवद्वीपातील लोकांना त्रास देऊ लागला. आपल्या मित्रांना घेऊन नदीवर जायचा. तासचे तास डुंबत बसायचा. नदीवर धुवायला येणाऱ्या बायकांची धुणीच फेकून दे, तर कुठे लहान मुलांना पाण्यात बुडव व पुनः बाहेर काढ, असे त्याचे उद्योग सुरू झाले. कुणी देवपूजेस बसले असेल तर त्याचे देव हा फेकून देई, देवाच्या पुढचा नैवद्यच खाई. कोणी धाक दाखवायला लागले तर सगळी मुलं त्याच्याभोवती गिल्ला करून त्यालाच 'सळो की पळो' करून सोडीत. दिवसेंदिवस निमाईच्या खोड्या वाढू लागल्या. नवीन खोड्या शोधून काढण्यातच त्याची बुद्धिमत्ता खर्च होऊ लागली. एक दिवस काही आंधळे भिकारी भीक मागतांना त्यांनी पाहिले. निमाई म्हणाला, " चला, आज आपण भिकाऱ्याचे सोंग घेऊ.

लगेच निमाईच्या डोळ्याला पट्ट्या बांधल्या, अंगावर लक्तरे घातली, आणि "आंधळ्याला पैसा दे दाता" म्हणून भिकाऱ्यांची माळका चालू लागली. निमाईच्या घराजवळ आल्यावर मुलं म्हणाली, "अरे निमाई, तुझं घर आलं. डोळ्याच्या पट्ट्या सोड" निमाई म्हणाला, "अरे येऊ दे, त्यात काय भ्यायचं ?" त्या वेळेला त्याने आईला जे उत्तर दिलं त्यामुळे आईच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. तिनं जगन्नाथ मिश्रांना निक्षून सांगितले की, उद्या-पासून निमाईला गुरुगृही पाठवायचं. शिकून विद्वान झालेले सगळेच काही संन्यास घेत नाहीत. आपल्या नशिबातच पुत्रसौख्य नसेल तर न शिकवता सुद्धा हा संन्यास घेईल. जगन्नाथ मिश्रांनी नाइ-लाजाने परवानगी दिली.

**अलौकिक बुद्धिमत्तेचा विद्यार्थी**

पंडित गंगादासांकडे निमाई शिकावयास जाऊ लागला. त्याची अलौकिक बुद्धिमत्ता पाहून गुरुजी त्याच्यावर खूष असत. गंगा-दासांचा व्याकरणावर फार मोठा अधिकार होता. त्यांच्या हाता-खाली निमाई तयार होऊ लागला. त्याच्या बुद्धिमत्तेची चमक दिसू लागली. व्याकरणातील खोचक प्रश्न विचारून तो वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांनासुद्धा निरूत्तर करी. त्या वेळी फक्त व्याकरण शास्त्र येऊन न्यायशास्त्र न येणाऱ्या विद्यार्थ्यांना कुचेष्ठेने "बाल" संबो-धीत. निमाईला बाल राहायचे नव्हते. त्याने पं. वासुदेव सार्वभौम यांच्याकडे न्यायशास्त्राचे शिक्षण घेतले. ते न्यायशास्त्रात नावा-प्रमाणे सार्वभौम होते. गदाधरासारख्या वरच्या वर्गातील विद्या-र्थ्यांना निमाई न्यायशास्त्रांतील अवघड गोष्टी समजावून देई.

**ग्रंथरचना**

गुरुजींची इच्छा होती की, विश्वंभराने-निमाईने ग्रंथरचना

करावी. त्यांच्या इच्छेप्रमाणे व्याकरणावर एक टीका लिहिली होती. पण उत्तर आयुष्यात आपल्या हातानेच ती त्याने नष्ट केली. न्यायशास्त्रावर सुद्धा एक अद्वितीय ग्रंथ लिहिला होता. पण तोही मित्रप्रेमासाठी नदीत फेकून दिला.

**ग्रंथ नदीत फेकून दिला**

एकदा अशीच घटना घडली. चैतन्याने–आता निमाईला लोक चैतन्य म्हणू लागले–नावेत पाऊल ठेवले. समोर बघितले. तो–समोर बालमित्र गदाधर बसलेला. "काय गदाधर कुठं निघालास, तुझे कुशल आहे ना ?' चैतन्यांनी विचारले. बराच वेळ दोघांच्या इतर गप्पा झाल्या. गप्पा मारता मारता गदाधराने विचारले, "चैतन्या, तुला आठवते का ? गुरुजींची इच्छा होती की, तू न्याय-शास्त्रावर एखादा ग्रंथ लिहावास तू लिहिले आहेस का काही ?' "हो हो, गुरुजींचा इच्छा मी कसा विसरेन. मी न्यायशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला आहे आणि योगायोग असा की तो मी आता बरोबर आणला आहे. तुला पाहावयाचा आहे का ?" चैतन्यांनी विचारले.

"हो, तुझी हरकत नसेल तर पाहण्याची इच्छा आहे" गदाधर म्हणाला

"छे: छे: हरकत कसली ?" म्हणून चैतन्यांनी काही भाग वाचून दाखविला. गदाधर ऐकत होता. चेहऱ्यावरचे भाव पालटत होते. चैतन्यांनी न्यायशास्त्रातील अवघड मुद्द्यांचे सुंदर–साध्या–सोप्या भाषेत विवेचन केले होते. चैतन्यांनीं वाचून संपविले. वर पाहिले तो गदाधराच्या डोळ्यात अश्रू!

"का रे, गदाधर, रडतोस का ?" चैतन्य.

"चैतन्या, मला वाटत होते की, माझ्यासारखा न्यायशास्त्रावर

दुसऱ्या कोणी ग्रंथ लिहिला नसेल. त्यामुळे मला साऱ्या भारतात प्रसिद्धी मिळेल. पण तुझ्या ग्रंथापुढें माझा ग्रंथ कोणी हातातही धरणार नाही, इतका तुझा ग्रंथ उत्कृष्ट आहे. आता मला कीर्ती मिळणार नाही, म्हणून वाईट वाटते." गदाधर म्हणाला.

"हात्तेच्या, एवढेच ना ! अरे, मित्रापुढे ग्रंथाची काय किंमत आहे?" असे म्हणून चैतन्यांनी बघता बघता तो ग्रंथ नदीत फेकून दिला. एक अद्वितीय ग्रंथ नष्ट झाला म्हणून गदाधराला वाईट वाटले. पण चैतन्याचे मित्रप्रेम मात्र अलौकिक होते.

**गृहस्थाश्रम**

चैतन्याने वल्लभाचार्य नावाच्या एका गरीब ब्राह्मणाच्या मुलीशी लग्न केले. आपल्या गुरुजींप्रमाणे त्यानेही पाठशाला काढली, त्याची शिकवण्याची हतोटी चांगली होती. म्हणून दूरदूरचे विद्यार्थी चैतन्याकडे येत. चैतन्य त्यांना प्रेमळपणे शिकवीत असत. त्यांचा गृहस्थाश्रमही व्यवस्थित चालला होता. पूर्ववयात चैतन्य अतिशय कर्मठ होते. पाठशाळेत एकादा मुलगा संध्या न करता किंवा गंध न लावता आला तर ते त्याला घरी पाठवत असत. त्यांना आपल्या पांडित्याचा गर्वही होता. वादविवादात ते मोठमोठ्या पण्डितांना सहज जिंकीत. पूर्वायुष्यात वैष्णवांची ते टिंगल करीत. ते म्हणत. "असे टाळ कुटून आणि भजन करून का कुठे परमेश्वर भेटणार आहे ?" पण त्यांच्या आयुष्यात परिवर्तन करणारी एक घटना घडली.

**जीवन बदलले**

माधवपुरीचे शिष्य ईश्वरपुरी हे एकदा नवद्वीपात आलें होते. त्यांनी केलेल्या चमत्कारांच्या गोष्टी चैतन्यांनी ऐकल्या होत्या. चैतन्य एकदा त्यांना भेटायला गेले. दोघांच्या गप्पा रंगल्या. रोज

चैतन्य त्यांच्याकडे जात. धार्मिक विषयांवर तासन् तास गप्पा होत. एकदा ईश्वरपुरींनी चैतन्य पंडित म्हणून त्यांच्याजवळ आपला "कृष्णलीलामृता" चा ग्रंथ शुद्ध करण्यासाठी दिला. चैतन्य म्हणाला, "यात काय शुद्ध करायचे ? भक्तिपूर्ण अन्त:करणाने लिहिलेली अशुद्ध ओळ सुद्धा देवाला प्रिय होते." ईश्वरपुरी दोन महिने नवद्विपात होते. नंतर ते गयेला गेले. चैतन्य गयेला गेले असता त्यांना भेटले व म्हणाले, "मला मंत्रदीक्षा द्या." ईश्वरपुरींनी चैतन्याची योग्यता पाहून मंत्रोपदेश दिला. मंत्राच्या जपात व चिन्तनात चैतन्य रंगून जाऊ लागले. कृष्णप्रेमाच्या सागरात डुंब लागले.

**वैष्णवांना नेता मिळाला**

चैतन्य नवद्वीपांत आला त्या वेळी बदललेला होता. जो चैतन्य वैष्णवांची टिंगल करीत असे तोच चैतन्य वैष्णवांना पाहून गहिवरून जाऊ लागला. आपल्याला एक चांगला नेता मिळाला म्हणून वैष्णवांना आनंद झाला. पण चैतन्यांची अवस्था कृष्णरूप झाली. कृष्णाची मूर्ति पाहिली, कृष्णाच्या कथा ऐकल्या की त्यांचे अष्टसात्त्विक भाव जागृत होत. सर्वांगाला कंप सुटे व ते मूर्च्छित होऊन पडत. त्यांना आपण राधा आहोत असे वाटे, मूर्च्छेतून जागे झाले की ते विलाप करीत, "माझा कृष्ण कुठं आहे, माझा कृष्ण कुठे आहे ? कोणी मला तो कृष्णसखा दाखवा हो,"– आयुष्यातील शेवटची सहा वर्षे त्यांनी राधाभावातच काढली.

**वैष्णव धर्माचा प्रसार**

त्यांनी वैष्णवधर्माचा आणि कृष्णभक्तीचा प्रसार केला. त्यासाठी त्यांनी भारताचा पायी प्रवास केला. त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वामुळे, मोहक वाणीमुळे आणि उत्कट भावाविष्कारामुळे लोकां-

वर चटकन् छाप पडे. त्यांनी लोकांना सांगितले की, संसारातील दुःखे नष्ट करण्यासाठी भगवत्‌भक्ती आणि भगवन्नाम हाच एक उपाय आहे. कृष्णभक्तीच्या प्रसारासाठीच चैतन्याचा जन्म झाला. चैतन्य भागवतकार वृंदावनदास म्हणतात,

"कलियुगे धर्म हय हरिसंकीर्तन
एतदर्थे अवतीर्ण श्रीशचीनंदन
एई कहे भागवत सर्वतत्त्वसार
कीर्तननिमित्त गौरचंद्र अवतार ॥

### संन्यास–ग्रहण

शेवटी चैतन्यांनी सर्व सांसारिक बंधने तोडायचे ठरविले. अवघ्या चोविसाव्या वर्षी त्यांनी केशवभारतीकडून संन्यास घेतला. शचीदेवीचा दुसरा मुलगाही संन्यासी झाला. तिला अति दुःख झाले. पण चैतन्याच्या या धर्मकार्यात ती आड आली नाही. नंतरही चैतन्यांनी कृष्णभक्तीचा प्रसार केला. भारतात सर्वत्र जाऊन त्यांनी वैष्णवधर्माचा जीर्णोद्धार केला. लोकांचा उध्दार केला. धर्माचा प्रसार करतांना त्यांनी दुसऱ्या संप्रदायाची निंदा केली नाही. आपल्या शिष्यांना ते अनेक रूपात दर्शन देत. कधी कधी कृष्णस्वरूपातही दर्शन देत. अवयव अलग करणे, असाध्य रोग बरे करणे इत्यादी चमत्कारही ते करून दाखवित. जगात सुख आणि शांती नांदावी अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी वैष्णव धर्माचा प्रसार केला. वयाच्या ४८ व्या वर्षापर्यंत कृष्णभक्तीचा प्रसार केला.

### जगन्नाथाच्या मूर्तीत विलीन

कृष्णाची आठवण काढताच ते रोमांचित होत. कधी कधी मूर्च्छित होत. ते अत्यंत भावुक मनाचे होते. सागराचा निळा रंग-

पाहून त्यांना कृष्णाची आठवण येई. सागर म्हणजे कृष्णच वाटे. त्याला भेटायला जात. शिष्यांना त्यांची फार काळजी घ्यावी लागे. एकदा असेच ते समुद्रकिनारी गेले असता समुद्राचे अफाट निळे पाणी पहून त्यांना वाटले की हा माझा कृष्णच आहे म्हणून त्याला भेटण्यासाठी भावावेशात त्यांनी " हरे कृष्ण "" हरेकृष्ण " म्हणून समुद्रात उडी टाकली ; व त्यातच त्यांचा अंत झाला. काही वैष्णवांचे असेच मत आहे की, महाप्रभु चैतन्य जगन्नाथाच्या मंदिरात दर्शन घेत असता जगन्नाथाच्या मूर्तीतच विलीन झाले. संवत् १५८० च्या आषाढ महिन्यात चैतन्य महाप्रभूंची प्राणज्योती कृष्णरूपात विलीन झाली.

● ● ●

# ९. नरसी मेहता



"वहिनी, मला जेवायला वाढ लौकर; मला भूक लागलीय्" नरसी म्हणाला.

"झालं का तुझं खेळणं; सदान् कदा बाहेर खेळत असतोस ! ना शाळा ना काम. म्हटलं मला थोडी मदत करील तर तेही नाही. नुसता खायला काळ आहे मेला! भाऊ दिवसभर कष्ट करून मिळवतो अन् हा आयता गिळायला येतो. असली कार्टी उलथून का जात नाहीत एकदा" वहिनींचे हे विषारी वाग्बाण नरसीच्या जिव्हारी लागले. तो लहान असला तरी मानापमान कळत होता, असलं अपमानाचं जिणं जगण्यापेक्षा या घरात न राहणं बरं म्हणून नरसी रागानं बाहेर पडला.

## कृष्णाची रासक्रीडा पाहिली

लहानगा नरसी जाणार तरी कुठं ? हा जुनागड येथे रहात होता. आई-वडील लहानपणीच वारले. मनाच्या नाही तरी लोकांच्या लाजेखातर थोरला भाऊ त्याचे पालनपोषण करीत होता. पण वहिनी मात्र त्याला पाण्यात पाही. सारखे घालून पाडून बोले. नरसी खेळत होता. त्याचे सगळे खेळ कृष्णाचे असत. खेळातसुद्धा तो कृष्णाचे भजन, कीर्तन करीत असे. वहिनींना नेमके हेच आवडत नसे. आजचे वाग्बाण नरसीच्या जिव्हारी लागले. तो घरातून बाहेर पडला. खूप खूप चालला. पुढे एक जंगल लागलं. निराश मनःस्थितीत तो चालतच राहिला. पण आता पुढे चालवेना. जवळच एक तळं दिसलं. त्याने हातपाय, तोंड धुतले. पोटभर पाणी प्याला आणि जवळच्या शंकराच्या देवळात आला. शंकराची पिंड पाहताच त्याला भडभडून आलं, ओक्साबोक्शी रडतच त्यानं पिंडीला मिठी मारली आणि आपली सारी करुण कथा शिवाला सांगितली. त्याचं घराणं शिवभक्त होतं. तो म्हणाला, "देवा मला दर्शन दे. त्याकरिता त्यानं हट्ट धरला. झोपेत जाई. तेवढा वेळ सोडून तो सारखा शिवाचं चिन्तन करी. भूक लागली की ओढ्याचं पाणी पोटभर पिऊन यावं आणि पुनः शिवचिन्तन करीत बसावं. सात दिवस आणि सात रात्री त्यानं शिवाचं चिन्तन केले. आठव्या दिवशी आशुतोष शंकर विरघळले. त्यांनी आपल्या बालभक्ताला दर्शन दिलं. भालावर चंद्रकोर, जटेतून गंगामाई वाहते आहे असा नीलकंठ पुढे उभा राहिला. नरसीने साष्टांग प्रणाम केला. शंकर म्हणाले, "बाळ तुला पाहिजे तो वर माग "--नरसी म्हणाला, "देवा तुम्हाला, जे आवडते मला द्या.--" मुलगा बावळा दिसत असला तरी चतुर होता हे शिवानं ओळखलं. शंकर म्हणाले, "मला श्रीकृष्ण

आवडतो. त्याच्या लीला आवडतात. त्याची रासक्रीडा आवडते. त्याचं सारं सारं आवडतं. नरसी म्हणाला, "देवा, मला तेच दाखवा." शंकर म्हणाले "ठीक आहे, चल," शंकराच्या कृपाप्रसादाने नरसींला कृष्णदर्शन झाले. त्याची रासक्रीडा चर्मचक्षूंनी पहावयास मिळाली. श्रीकृष्ण म्हणाले, "नरसी तू पाहिलेली रासक्रीडा लोकांना सांग. याच्यावर पदे रच. लोकांना भक्तिमार्गाला लाव."

नरसीत आता बदल झाला होता. त्याला आनंदाचा ठेवाच सांपडला होता. तो फळे खाऊन राह्यचा. कृष्णाच्या रासक्रीडेवर पदे रचायचा. त्याचीं पदे, भजने इतकी मधुर व भावपूर्ण असत की, जाणारे येणारे लोक, गुराखी तासन्तास ऐकत बसत. हळूहळू त्याची कीर्ति गावात पसरली. भावाला नरसीचा पत्ता कळला. तो नरसीला भेटायला आला. कशी तरीं समजूत घालून त्याला घरी आणला. घरी आल्याबर सुद्धा त्याचा सारा दिवस कृष्णभजनात जाई. पुढे एक दिवस शेजारच्या गावच्या सावकाराच्या उपाध्यायाने नरसीचे लग्न सावकाराच्या मुलीशी ठरविले. सावकाराशी सोयरीक जमणार म्हणून भावाला अति आनंद झाला, पण सावकाराला हा संबंध मान्य नव्हता. लग्न मोडण्यासाठी म्हणून सावकाराने उपाध्यायाबरोबर निरोप पाठविला की, आम्ही मोठी माणसे, आमच्या इतमामाला साजेल अशा थाटाने यावे. हत्ती, घोडे, बहुमूल्य वस्त्रालंकार वगैरे घेऊन यावे. उपाध्यायानें हा निरोप सांगितला नाही. नरसी लग्नाला निघाला. अंगावर गंधाचे टिळे, गळ्यात तुळशीची माळ, बरोबर भजनीं लोकांचे तांडे अशा थाटात वऱ्हाड निघाले. पण आपल्या भक्ताची लाज परमेश्वराला होती. तो द्वारकेचा राणा आपल्या सगळ्या वैभवानिशी नरसींबरोबर निघाला.

ते वैभव पाहून सावकार थक्क झाला. थाटामाटाने नरसीचे लग्न सावकाराच्या मुलीशी झाले.

**महारवाड्यात भजन**

नरसी मेहताने ओळखलं की, आपलं संकट भगवान् श्रीकृष्णांनी दूर केलं. तो त्याला विसरला नाही. लग्न झाल्यावर पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने भक्ति करू लागला. दिवसभर कृष्णाचं चिन्तन करी. रात्री हातात एकतारी व चिपळ्या घेऊन गोड आवाजात कृष्णाची भजने म्हणत असे. नाचत असे, गात असे, दुसरीकडे सुद्धा तो भजने म्हणायला जाई. एक दिवस सकाळी नरसी रस्त्याने जात असता काही महार त्याच्या समोर येऊन उभे राहिले. त्यांनी हात जोडले. नरसीने विचारले, " काय इच्छा आहे ? " "काहीं नाही महाराज, आपण जातिभेद मानीत नाही. आपण आमच्याकडे भजनाला यावे. " महारांनी विनंती केली. नरसी मेहता म्हणाले, " ठीक आहे, देव जसा माझ्या देव्हाऱ्यात आहे तसा तुमच्या महारवाड्यातहि आहे. मी अवश्य येईन भजनाला. " नरसी मेहता भजनाला येणार म्हणून महारांना आतिशय आनंद झाला. त्यांनीं महारवाडा सारवला. एक तुळशीवृंदावन आणले. कृष्णाची मूर्ती आणली. सगळीकडे साफसफाई केली. जागोजाग पणत्या लावल्या. पण ही बातमी गावातील ब्राह्मणांना कळताच त्यांचे पित्त खवळले एक ब्राह्मण महारांच्या घरी भजनाला जातो म्हणजे काय ? त्यावेळी महाराची सावली पडली तरी आंघोळ करावी लागत होती. लोक नरसीला मारण्यासाठी लपून बसले. नरसी महारांकडे गेला रात्री दोनतीन वाजेपर्यंत भजन चालले होते. भजन फारच रंगले. महारांनाहि आनंद वाटला. पण येताना मात्र लोकांनी नरसी मेहताला दगड मारले. त्याला शिव्या दिल्या, त्याच्या

अंगावर थुंकलेही; पण नरसी मेहता रागावले नाहीत. त्यांनी शांतपणे लोकांना उपदेश केला कीं, 'बाबांनो, देव सर्वत्र आहे. देवाजवळ हा ब्राह्मण, हा महार असा भेद नाही. त्याला सर्व सारखेच. नरसी मेहता घरी आला. कडाक्याची थंडी पडली होती. तशात वहिनींनी गार पाण्याची घागर अंगावर ओतून नरसीला शुद्ध करून घरात घेतले. पण नरसी मेहता रागावले नाहीत. ते कृष्णभजनात रंगून गेले होते.

## हुंडी पटली

'' नरसी मेहता कृष्णाशी एकरूप झाले होते. त्यानीं आपल्या संसाराचा सर्व भार कृष्णावर घातला होता. भक्तासाठी द्वारकेचा हरि वारंवार धावून येत होता. भक्ताची बेंअब्रू तो देवाची बेअब्रू. एकदा एक ब्राह्मण द्वारकेला जाता जाता जुनागडला आला होता. त्याने येथे कोणी सावकार आहे का, म्हणून चौकशी केली. टवाळखोरांनीं नरसी मेहताच्या घराकडे बोट दाखविले. ब्राह्मण नरसी मेहताकडे आला. आपल्या जवळचे ७०० रु. देऊन तो हुंडी मागू लागला. नरसी मेहताने टवाळखोरांचे कारस्थान ओळखले. त्याने सातशे रुपये घेऊन द्वारकेच्या श्रीहरीच्या नावाने—सामळशा सावकाराच्या नावाने हुंडी लिहून दिली. भक्ताची लाज राखण्यासाठी कृष्णाने सामळशा सावकाराचे रूप घेऊन त्या ब्राह्मणाला हुंडीचे सातशे रुपये दिले. एकदा व्याह्याकडे गेला असता नरसी मेहताने आहेर वगैरे काही नेले नव्हते. व्याह्याकडील लोकांनी त्याची चेष्टा, टिंगल करायला सुरवात केली. नरसी मेहता म्हणाला, " कोणाला काय काय आहेर पाहिजे त्याची यादी तयार करा." थोड्याच वेळात यादी यतार झाली. काही वेळानंतर श्रीकृष्ण एका गृहस्थाचे

रूप घेऊन आले. बरोबर पेटारे होते. त्यांनी प्रत्येकाने मागितलेल्या अहेराच्या वस्तु देऊन टाकल्या. अशा रीतीने अनेक वेळा श्रीकृष्णाने त्यांची संकटे दूर केली.

## राजाची भ्रांति दूर झाली

नरसी तन्मयतेने कृष्णाची भक्ति करी. त्याच्या रोमरोमात कृष्ण भिनला होता. रात्री तो कीर्तन करीत असे. कीर्तन करताना तो मध्येच गात असे, हसत असे, नाचत असे, निरूपण करीत असे. सांगतात की प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण त्याचे कीर्तन ऐकायला येऊन बसत आणि त्याची प्रचीति म्हणजे श्रीकृष्णाच्या गळ्यातील हार नरसी मेहताच्या गळ्यात येऊन पडे. भाविक लोक नरसी मेहताच्या भजनी लागले. पण कुटाळ लोक त्याची टिंगल करीत असत. त्यांनी राजाचे कान भरले की, नरसी भोंदू आहे. तो भोळ्या भाबड्या लोकांना फसवतो. एक दिवस प्रत्यक्ष राजा कीर्तनास येऊन बसला. खरी गोष्ट काय आहे हे त्याला पाहावयाचे होते. येताना त्यांने बरोबर हार आणला होता. त्याने तो पुजाऱ्याला दिला आणि सांगितले, "हा एकच हार देवाच्या गळ्यात घाला. तो सुद्धा घट्ट टाके घालून देवाच्या अंगरख्याला पक्का शिवून टाका. पाहू या तर खरं की आता त्या भोंदू नरसीच्या गळ्यात कसा हार पडतो ते." पुजाऱ्याने राजाच्या सांगण्याप्रमाणें तो हार देवाच्या अंगरख्याला घट्ट शिवून टाकला. कीर्तन सुरू झाले. नरसी तन्मयतेने कृष्णकथा गायनांत रंगून गेला होता. श्रोतेही भक्तिरसाच्या सागरात डुंबत होते. काठावर होता तो फक्त एक राजाच. तो डोळ्यांत तेल घालून पाहात होता कीं नरसीचा गळ्यात देवाच्या गळ्यातील हार कसा पडतो? त्याला नरसीचा भोंदूपणा सिद्ध करायचा होता. कीर्तन ऐन रंगांत आले होते. श्रोते शरीराचे कान करून कथा ऐकत होते.

राजाचे डोळे देवाच्या गळ्यातील हाराकडे होते. इतक्यात देवाच्या गळ्यातील हार नरसीकडे येऊ लागला. राजाचे डोळेहि हारावर खिळले होते. हळू हळू तो हार येऊन नरसीच्या गळ्यात पडला. राजा ी भ्रान्ति फिटली. त्याने नरसीचे पाय धरले. क्षमा मागितली. तो म्हणाला, "नरसी मेहता तुम्ही खरोखर देवाचे लाडके भक्त आहात. आम्ही विषय–कर्दमात वळवळणारे कीडे. तुमची भक्ती श्रेष्ठ आहे." धन्य तो नरसी. त्या दिवशी कीर्तन खूपच रंगलं. प्रत्येक जण नरसीची स्तुति करीतच घरी गेला.

नरसी गुजराथमधील आदि कवि होता. त्याच्यापासून गुजराथीत कविता स्फुरली. त्याने जवळ जवळ सव्वालाख पदे रचली. सुदामाचरित्र, चातुरी षोडशी, शामलदासाचा विवाह, दानलीला, रासलीला वगैरे काव्यग्रंथही लिहिले. 'झूलना' छंदात त्याने आपल्या कविता रचल्या. त्याच्या काव्यात शृंगार आहे. पण तो केवळ शृंगारासाठी नसून भक्तीसाठी आहे. नरसीच्या शृंगाराचा शेवट भक्तीत होतो. त्याच्या काव्यात भक्तीरस जणु मूर्तिमंत अवतरला आहे. पुरूष असूनही स्त्री हृदयाच्या भावना त्याने उत्तम रीतीने रेखाटल्या आहेत. त्याच्या काव्यात केवळ भक्तीच आहे असं नाही तर तत्त्वज्ञानाचे गहन विचार सुद्धा सोप्या भाषेत मांडलेले आहेत. नरसीचे काव्य अमर आहे; अजर आहे. ग्रामीण लोकच काय पण विद्वान लोकसुद्धा त्याचा आस्वाद घेतात. व आनंद मिळवतात. आज कित्येक वर्षे झाली पण नरसीच्या काव्यातील गोडी विटली नाही की कमी झाली नाही. 'वैष्णव जन तो तेणे कहिये" या पदाने तर नरसीला अमर केले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजी रोज प्रार्थनेच्या वेळी हे पद म्हणत असत, त्याचं मराठी भाषांतरसुद्धा किती सुंदर साधलं आहे पहा–

"वैष्णव जन त्यालाच म्हणावे।
जो परपीडा जाणी रे ॥ ध्रू ॥
सकलांमाजी राही वंदी
निंदा न करी कुणाची रे ॥ १ ॥
असत्य वाणी कधि ना बोले
परधन हाती न धरी रे ॥ २ ॥
कृष्ण नामि जो घेई समाधी
तीर्थे त्याच्या शरिरी रे ॥ ३ ॥
नरसी म्हणतो दर्शन त्याचे
शरणार्थी जन तारी रे" ॥ ४ ॥

नरसी मेहता यांनी एक पद जरी रचले असते तरी ते अमर झाले असते. असा हा गुजराथेतील आदि कवि आणि महान कृष्ण-भक्त इ. स. १४८१ मध्ये कृष्णस्वरूपात विलीन झाला.

• • •

# शीख धर्माचा संस्थापक-नानक



**जन्म व बालपण**

"नानक, माझ्या शेताचीं दोन-तीन दिवस राखण करशील का ? मी शेजारच्या गावी यात्रेला जाऊन येतो. माझ्या शेतात दहा पोती धान्य निघते. त्यातील एक पोते मी तुला देईन."-एका वृद्ध शेतकऱ्याने सांगितले. नानक म्हणाले, "हो तुम्ही खुशाल यात्रेला जा. मी राखण करीन."

शेतकरीं नानकाच्या जबाबदारीवर शेत टाकून निघाला. शेत भरघोस कणसांनीं भरले होते. चिमण्या दाणे खायाला येऊ लागल्या पण त्यांना नानकाने दगड मारून हाकलले नाही. नानकाने विचार

केला, शेतही रामाचेच आहे आणि चिमण्याही रामाच्याच आहेत॰ त्यांच्या हिश्शाचे दाणे त्या खातात. खाऊ देत बिचाऱ्या. आपण कशाला दगड मारून हाकलायाचे? प्रत्येक दाण्या-दाण्यावर खाणाऱ्याचे नाव लिहिलेले असते-

" दाने दाने पर लिखा है खानेवालेका नाम
राम की है चिडियाँ फत्तरका नही काम
राम की चिडियां रामका खेत
खा लो चिवे भरभर पेट "

रोज चिमण्या येत, दाणे खाऊन निघून जात॰ तिसरे दिवशी शेतकरी आला. त्याने पाहिले की, चिमण्यांचे थवेच्या थवे आपले शेत फस्त करीत आहेत. शेतकरी नानकावर चिडला॰ तो रागावून म्हणाला, 'हीच का तू शेताची राखण करतोस? चिमण्यांनी माझं शेत खाऊन टाकलं. आता मला तू नुकसानभरपाई दे.''नानक म्हणाले 'अहो चिमण्यांनी चिमण्यांच्या हिश्शाचे दाणे खाल्ले. तुमच्या शेतातील दाणे तसेच आहेत. ते काही चिमण्यांनी खाल्ले नाहीत, " शेतकरी म्हणाला, " मला खोटं बोलून फसवतोस का ? मी नुक, सानभरपाई घेतल्याशिवाय सोडणार नाही. " नानक म्हणाले- " तुम्ही कापणी केल्यावर पहा तर खरं ; दाणे किती भरतात ते आणि मग बोला. " शेतकऱ्याने कापणी केली. आश्चर्य असे की, दहा पोत्यांच्या ऐवजी अकरा पोती धान्य भरले. शेतकरी नानकाला शरण गेला आणि त्याने खुशीने दोन पोती धान्य नानकाला दिले.

**अध्यात्मिक ज्ञानवे**

नानक हा तळवंडी येथील राहणारा. तळवंडी गाव लाहोरच्या आग्नेय दिशेस आहे. तेथे काळूराम अपटवारी नावाचा शेतकरी

रहात असे. त्याच्या पोटीच इ. स. १४६९ मध्ये नानकाचा जन्म झाला. त्याच्या आईचे नांव तृप्ता. नानक हा लहानपणापासूनच देववेडा होता. पंडित हरिदयाल नावाच्या एका ज्योतिषाने याच्या बाबतीत भविष्य वर्तविले होते की, हा पुढे जगाचे कल्याण करणारा मोठा साधु होईल. लहानपणी परमेश्वराच्या शोधासाठी नानक दाट जंगलातून दऱ्याखोऱ्यातून, पर्वत-पहाडातून हिंडत असे. पण त्याला त्या ठिकाणी परमेश्वर भेटला नाही. असे म्हणतात कीं जंगलातून हिंडत असताना ईश्वरीय ज्ञानाची ज्योति त्याच्या शरिरात शिरली. त्याच्या शिक्षणाची तऱ्हा सुद्धा अशीच अजब होती. वडिलांनी त्याला गुरुजीकडे शिकायला पाठविले. गुरुजींनी, त्याला काही अक्षरे शिकविली. पण नानक म्हणाला 'मी ही अक्षरे शिकणार नाही. तुम्ही मला परमेश्वराचे नाव शिकवा. जे घेतले असता मरणाचे भय दूर पळून जाईल.' एकदा फारशी पंडितानें सुद्धा त्याला असेच विचारले होते की, बाळ तुला आज मी काय शिकवू ? नानक म्हणाला, "गुरुजी, तुम्ही मला परमेश्वराची भजने शिकवा."

**व्यापारात भांडवल गमावले**

नानकाचा सगळा वेळ परमेश्वराच्या चिंतनात जाई. आणि त्या चिंतनातूनच तत्त्वज्ञानाचे काही विचार सहज बोलन जात असे. एकदा मुंजीच्या वेळी तो म्हणाला, "मला असले कसले जानवे घालता? मला वेगळ्या प्रकारचे जानवे हवे आहे. दयेचा कापूस बनवा त्यापासून संतोषाचे सूत तयार करा. त्या सुताला सत्याचा लेप द्या. नंतर त्यावर संयमाचे संस्कार करा. असे जानवे मला घाला की, जे तुटणार नाही, मळणार नाही, जळणार नाही." जीवनाचे केवढे गहन तत्त्वज्ञान एका लहानशा मुलाने सांगितले होते.

नानकाचा हा देवभोळेपणा वाढतच चालला. कोणत्याच धंद्यात त्याचे मन रमेना, वडिलांना काळजी पडली की, या पोराचे होणार तरी काय? एक दिवस त्याला व्यापारांत गुंतवायचे ठरविले. वडिलांनीं त्याच्याजवळ व्यापारासाठी वीस रुपये दिले. नानक व्यापाराला निघाला. वाटेत त्याला काही साधू भेटले. नानकाचे मन साधूंच्या संगतीत रमले साधु दोन-तीन दिवस उपाशी होते. म्हणून नानकाने आपल्या जवळचे वीस रुपये त्यांना देऊन टाकले. घरी आल्यावर वडिलांना ही हकीकत कळली. व्यापारात फायदा मिळवायच्या ऐवजी हा भांडवलही घालवून बसला. म्हणून वडिलांचा राग अनावर झाला. त्यांनी नानकाला खूप बडविले. पण नानकाचा मूळ स्वभाव कसा जाणार?

### खुप पैसे कमावले व खूप पैसे गमावले

वयाच्या २५ व्या वर्षी नानकाचे लग्न झाले. त्याच्या पत्नीचे नांव सुलक्षणी. गुरूदासपूर जिल्ह्यातील मुलाराम पटवारीची ती मुलगी. नानकाचे लक्ष संसारात लागेना. संसार चालावा म्हणून वडिलांनी त्याला सरकारी मोदीखान्यात नोकरी लावून दिली. नोकरी करण्यासाठी ते मेव्हण्याकडे राहू लागले. पण नोकरीतही तें ईश्वराचे भजन करीत. एकीकडे कोठीतील धान्य मोजून देत व एकीकडे देवाचे भजन करीत. कोठींतील धान्य ते गोरगरिबांना देऊन टाकीत. एकदा चुगलखोरांनी याबद्दल चुगली केली. सरकारी अधिकाऱ्यांनी कोठीची तपासणी केली, हिशेब तपासले. पण परमेश्वराने नानकाची लाज राखली. कोठीतील माल व्यवस्थित होता. पैशाचा हिशेबहि बिनचूक होता. चुगलखोरांची तोंडे बंद झाली. एक वर्षानंतर वडील नानकाला भेटायला आले. त्यांना वाटले

की नानकाने खूप पैसे मिळविले असतील, म्हणून त्यानी विचारले, 'नानका, किती पैसे मिळविलेस ?' नानकांनी उत्तर दिले, 'बाबा, खूप पैसे मिळविले आणि घालविलेहि खूप.– सगळे गोरगरिबांना वाटून टाकले. " वडील खूप संतापले–वाटेल तसे बोलू लागले. तेव्हा नानकाची बहीण मध्ये पडली आणि म्हणाली, "बाबा, उगीच का इतके संतापता? त्याने काही व्यसनात तर पैसे उडविले नाहीत ना ? गोरगरिबांनाच वाटून टाकलेत.' वडील शांत झाले व शेवटी त्यांनी नानकाचा नाद सोडला. बायकोलाही नानकाचे हे वागणे आवडत नसे. ती आपल्या माहेरी राहात असे. नानका–जवळ फारच थोडे दिवस राहिली. नानकाने सरकारी मोदीखान्यात बारा वर्षे काम केले. शेवटी त्याला विरक्ती प्राप्त झाली. एक दिवस तो कोठीत धान्य मोजत होता. ' एक दो–बारह–तेरह–तेरह-तेरा–तेरा' या आकड्यावर तो आला. तेरा तेरा म्हणताना तो चमकला. तेरा म्हणजे तुझं. या जगात येऊन तू तुझे काय मिळवलंस ? तुझं भलं काय केलंस ? नानकाने ठरविले की आता संसाराचा त्याग करायचा. सर्व बंधने सोडून देऊन नानक तीर्थयात्रेला बाहेर पडले.

### स्वतंत्र विचारक

प्रत्येक गोष्ट नानक उघड्या डोळ्यांनी पहात असे. बुद्धीच्या निकषावर पारखून घेत असे. एकदा नानक गयेला गेले. कुंभमेळा भरला होता. भाविकांची गर्दी झाली होती. काही ब्राह्मण नदीत उतरून पितरांना तर्पण करीत होते, पाणी सोडत होते. नानक नदीत उतरले. आपल्या उजव्या बाजूला पाणी फेकू लागले. लोकांना कळेना की हा असं पाणी का उडवतोय ? एका ब्राह्मणाने विचारले, 'काय हो, तुम्ही हे काय करीत आहात?' 'नानक म्हणाले,' तुम्ही जे करीत आहात तेच मी करीत आहे. ' ब्राह्मण म्हणाला,' मी माझ्या स्वर्गातील पितरांना पाणी देत आहे. तुम्ही काय करता ?'

नानक म्हणाले, 'येथून दूर असलेल्या माझ्या शेताला मी पाणी देत आहे.'

'येथून दूर असलेल्या शेताला येथून पाणी कसे देता येईल ? कुचेष्टेने हसत हसत ब्राह्मणाने विचारले. नानक म्हणाले, 'येथून खूप दूर असलेल्या स्वर्गातील पितरांना तुमचे पाणी पोचू शकते तर माझ्या शेताला पाणी का पोचू शकणार नाहीं ? माझे शेत तर स्वर्गापेक्षा किती तरी जवळ आहे.' नानकाच्या उत्तराने ब्राह्मण खजील झाला. काही न बोलता खाली मान घालून निघून गेला.

**अल्ला सर्वत्र आहे**

नानकाच्या वेळी हिंदु –मुसलमानात तेढ होती. सारखी भांडणे होत. नानकाने विचार केला की या दोघांना एकत्र आणले पाहिजे. प्रेमाच्या बंधनात बांधले पाहिजे. म्हणून त्याने शीख धर्माची स्थापना केली. त्यात जातिभेद नाही. भांडणे नाहीत. नानकाने उपदेश केला की परमेश्वर एकच आहे. तो कोणत्याहि धर्माचा नाही. जो भक्तिभावनेनें त्याला शरण जातो त्याला तो मिळतो. तो सर्वत्र आहे. एकदा नानक मक्केला गेला होता. काबा तेथील पवित्रस्थान. रात्री नानक काबाकडे पाय करून झोपला. तेथील पुजारी चिडला. त्यानें लाथ मारून नानकाला उठविले आणि विचारले–"काय मूर्खा, काबाकडे पाय करून झोपतोस ? तुला काही कळत नाही !" नानक म्हणाले, "महाराज, रागवता का ?

'अल्ला सर्वत्र आहे. अल्ला नसेल अशा ठिकाणी माझे पाय ठेवा' पुजाऱ्याने नानकाचे पाय दुसऱ्या दिशेला ठेवले. पण ज्या दिशेला पाय ठेविल त्या दिशेला काबाचा मार्ग दिसू लागे. शेवटी पुजारी नानकाला शरण गेला. असे कित्येक हिंदु आणि मुसलमान नानकाचे शिष्य बनले.

**धर्म प्रसार**

नानक भजन करीत करीत आपल्या धर्माचा प्रसार करीत असे. त्याला ‘मरदाना’ नावाचा शिष्य मिळाला. तो त्याना साथ करीत असे. नानक भजन म्हणत.

“काहे रे बन खोजन जाई। सर्वनिवासी सदा अलेपा
तोही संग समाई। पुष्पमध्य ज्यो बास बसत है,
मुकुंदमध्य ज्यों छाई। तैसे ही हरि बसै निरंतर
घट ही खोजो भाई॥

अशा रीतीने नानकाने लोकांना प्रेमाचा उपदेश केला. हिंदु–मुसलमान एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. पुढे शीख धर्माचा प्रसार वाढला. त्याचे एकूण दहा गुरु झाले. सगळे तेजस्वी आणि पराक्रमी होते. स्वतःच्या संरक्षणासाठी पुढील गुरूंनी आपल्या शिष्यांना शस्त्रसज्ज केलं

**देहही अदृश्य झाला !**

असा हा हिंदु–मुसलमानांना एकत्र आणणारा, जगाला प्रेमाचे धडे देणारा शीख धर्मांचा संस्थापक २२ सप्टेंबर १५३९ साली करतापूर येथे मरण पावला. असे सांगतात की, कबीराप्रमाणे यांच्या प्रेतासाठी हिंदु-मुसलमानात भांडणे झाली पण जेव्हा प्रेतावरची चादर दूर करून पाहतात तो आत काही नाही. नानक अदृश्य झाले होते. लोकांनी ती चादर अर्धी अर्धी वाटून घेतली. मुसलमानांनी तिचे दफन केले आणि हिंदूनी तिचे दहन केले. शेवटी नानकाचा पार्थिव देह सुद्धा शिल्लक राहिला नाही.

• • •

# ‘अभिनव जयदेव’- विद्यापति



‘गंगालहरी’ लिहिणाऱ्या संस्कृत कवि जगन्नाथ पंडिताचा उध्दार गंगामाईने स्वतः बावन्न पायऱ्या वर येऊन केला. त्याप्रमाणेच हिन्दीतील एका प्रसिद्ध कवीचा उद्धार गंगामाईने स्वतः येऊन केला. माहीत आहे कोण होता तो कवि? तो कवि म्हणजेच मैथिली कोकिल विद्यापति ठाकुर.

याचा जन्म मिथिला प्रान्तात दरभंगा जिल्ह्यात विसपी नावाच्या गावात झाला. यालाच ‘गढविसपी’ असेही म्हणतात. इसवी सन १३६० मध्ये याचा जन्म झाला असे विद्वानांचे मत आहे. गणपति ठाकुरांचा हा एकुलता एक मुलगा. याच्या आईचे

नाव गंगादेवी. वडील राजदरबारात कवि होते. वडिलांच्या बरोबर दहा अकरा वर्षांचा छोटा विद्यापति राजदरबारात जाई, तेथील गोष्टींचे सूक्ष्म निरीक्षण करी.

लहानपणी याचे शिक्षण मिथिलेतील विद्वान पंडित हरिमिश्रांजवळ झाले. पण लहानपणी राजदरबारात ये—जा वाढल्यामुळे याने शास्त्रांचा व्यासंग केला नाही. राजदरबारात जेवढा आवश्यक होता, तेवढ्याच शास्त्रांचा अभ्यास याने केला. याच वेळी विद्यापतीतील कवि जागा झाला, प्रतिभा जागृत झाली. त्याला काव्य स्फुरू लागले, वयाच्या विसाव्या वर्षी त्याने पहिली काव्यरचना केली. कीर्तिसिंहाला अैकवण्यासाठी 'अवहट्ट' भाषेत कीर्तिलतेची रचना केली. अवहट्ट भाषेत कीर्तिपताकाही रचली.

विद्यापतींनी संस्कृत, अवहट्ट आणि मैथिली अशा तीन्ही भाषेत काव्यरचना केली.

विद्यापती दीर्घायुषी होते. जवळ जवळ ८६ वर्षे जगल्यामुळे अनेक राजांचा आश्रय त्यांना मिळाला. शत्रु असो, किंवा मित्र असो, प्रत्येक राजाच्या स्मरणार्थ त्या त्या राजाच्या नावानें त्यांनी पदे लिहिली, त्यामुळे विद्यापति सर्वांना प्रिय होते. पण विद्यापतीचे प्रेम मात्र राजा शिवसिंह आणि त्याची बायको लखिमादेवी यांच्यावरच होते. शिवसिंह त्याला आपल्या मित्राप्रमाणे समजत असे. दोघेही एकमेकांवर मित्राप्रमाणे प्रेम करीत. एकमेकांच्या मदतीला धावून जात. शिवसिंह लहानपणापासूनच पराक्रमी होता. तो जवळ जवळ पन्नासाव्या वर्षी गादीवर बसला. तोपर्यंत त्याचे वडील देवसिंह राज्य करीत होते.

एकदा मुसलमानांनी मिथिलेवर हल्ला केला. लढाईमध्ये देवसिंहाचा पराभव झाला. देवसिंहानें मुसलमानांचे मांडलिकत्व पत्करले व तो राज्य करू लागला. शिवसिंहाला हे आवडले नाही.

तो याच्या विरुद्ध होता. बादशहाला शिवसिहाची भीति वाटत होती. म्हणून त्याला कैद करून दिल्लीला नेले. इकडे आई वडिलांना अतिशय दु:ख झाले, विद्यापती आपल्या मित्राला सोडविण्यासाठी दिल्लीला गेला तेथे बादशहाला आपला परिचय करून दिला आणि सांगितले, " मी न पाहिलेल्या वस्तूचे सुद्धा हुबेहूब वर्णन करतो " बादशहाने त्याची परीक्षा घेण्यासाठी त्याला एका नुकत्याच स्नान केलेल्या सुंदर स्त्रीचे वर्णन करण्यास सांगितले. विद्यापतीने हुबेहूब वर्णन केले. वर्णन ऐकून बादशहा खूष झाला पण त्याच्या चेहऱ्यावर समाधानाची छटा मात्र दिसली नाही; बादशहानें त्याची दुसऱ्या तऱ्हेने परीक्षा घेतली.

एक दिवस त्याला एका लाकडी पेटीत बंद करून दोरी बांधून विहिरीत सोडले आणि काठावर काय काय चालले आहे त्याचे वर्णन करण्यास सांगितले. विद्यापतीला आत सोडल्यावर राजवाड्यांतील एक सुंदर दासी विहिरीच्या काठावर येऊन काही कामासाठी आग पेटवीत होती आणि तोंडाने जोरजोराने फुंकत होती. ती दासी गेल्यावर विद्यापतीला बाहेर काढण्यात आलें. आणि विचारले की काठावर काय चालले होते ? विद्यापतीने चूला फुंकणाऱ्या त्या सुंदर स्त्रीचे हुबेहूब वर्णन केले. आता बादशहाला विद्यापतीच्या बोलण्याची खात्री पटली. त्याने त्याला 'शतावधान' पदवी दिली. शिवसिहाला व विद्यापतीला सोडून देऊन मिथिलेला रवानगी केली.

विद्यापतीची सरस व मधुर पदे शिवसिंह व लखिमादेवी ह्या दोघांनाही आवडत. दोघेही त्याला काव्य करण्यास उत्साह देत. विद्यापतीने बहुतेक शृंगाराचीच पदे रचली. त्याच्या काव्यावर खूष होऊन शिवसिहाने त्याला 'विसपी' गाव इनाम दिले एवढेच नव्हे तर विद्यापतीची पदे रागदारीत बसविण्यासाठी, त्याला चाली

लावण्यासाठी 'जयत' नावाच्या गायकाची नेमणूक केली. त्याने विद्यापतीच्या पदांना चाली लावायच्या आणि राजदरबारात व अन्तःपुरात ती पदे म्हणून दाखवायची. विद्यापतीच्या कवित्व शक्ति मुळे त्याला 'सरस कवि', 'अभिनव जयदेव', ' सुकवि, कवि शेखर', 'मैथिली कोकिल','सुकवि कंठहार'इत्यादि पदव्या मिळाल्या. त्याची पदे जयदेवांच्या पदांइतकीच सरस असल्यामुळे शिवसिंहाने त्याला अभिनव जयदेव अशी पदवी दिली. इतके असूनही विद्यापतीला आपल्या कवित्व शक्तीचा कधी गर्व झाला नाही.

शिवसिंह आणि लखिमादेवी यांच्या मृत्यूनंतर विरक्त होऊन विद्यापती शंकराची भक्ति करू लागला. तो शंकराचा एकनिष्ठ भक्त होता. त्याने आध्यात्मिक पदांची रचना केली. शिव, गंगा, दुर्गा इत्यादींव रकाव्य रचले. एक पदात राधाकृष्णाच्या विरहाचे व त्यांच्या एकरूपत्वाचे वर्णन फारच सुंदर केलेले आहे. राधा म्हणजे जीव आणि कृष्ण म्हणजे शिव. या दोघांच्या ऐक्याचे वर्णन अतिशय उत्कृष्ट आहे. राधेला कृष्ण भेटत नाही म्हणून ती कृष्णाच्या नावाचा जप करते. सारखी कृष्ण कृष्ण ' म्हणत असते. कृष्णाचा जप करीत असताना ती इतकी बेहोष होते की स्वतःला कृष्ण समजून राधा भेटत नाही म्हणून 'राधे राधे' असा राधेच्या नावाचा जप करते. पुनः शुद्धीवर आल्यावर ' कृष्ण कृष्ण ' म्हणू लागते. इतकी राधा व कृष्ण एकरूप झालेली असतात.

" अनुखन माधव माधव सुमिरत । सुंदरी भेलि मथाई ।। "

या पदाबद्दल असे सांगतात की हे पद गात असताना महाप्रभु चैतन्य आणि चंडिदास आनंदाने बेहोष होत.

विद्यापती शंकराचे एकनिष्ठ भक्त होते. त्याच्या भक्तिमुळे शंकर त्याला वश झाले होते. आपल्याकडे एकनाथ महाराजांच्या घरी देव श्रीखंडयाच्या रूपाने ज्याप्रमाणे काम करीत असत.

त्याचप्रमाणे विद्यापतीकडे शंकर 'उगना' किंवा 'उदना'च्या रूपाने काम करीत असत. एके दिवशी उगनाला बरोबर घेऊन काही कामासाठी विद्यापती दुसऱ्या गावाला चालले होते. दुपारची वेळ होती. उन्हे रणरणत होती. विद्यापतींना अतिशय तहान लागली. आजुबाजूला दाट जंगल असल्याने जवळपास कोठेच पाणी सापडले नाही. त्यांनी उगनाला पाण्याच्या शोधासाठी पाठविले. उगनाने परत येऊन सांगितले की पाणी कुठेच नाही. विद्यापतींनी सांगितले, जा, पुनः जाऊन शोध. पाण्यावाचून माझे प्राण अगदी व्याकुळ झाले आहेत. जा, लौकर पाणी घेऊन ये. उगनाला विद्यापतींची अवस्था पाहून वाईट वाटले. तो पुनः पाणी आणण्यास गेला. थोडयाच वेळात उगना लोटाभर स्वच्छ पाणी घेऊन आला. विद्यापती पाणी प्याले. पाण्याची चव त्यांना गंगाजलासारखी लागली. पाणी प्याल्यावर त्यांची खात्री झाली की हे साधे पाणी नसून गंगाजलच आहे. त्यांनी उगनाला विचारले,हे पाणी तू कोठून आणलेस?' उगना म्हणाला, 'जवळच एक विहिर आहे, त्या विहिरीतून मी हे पाणी आणले. विद्यापती म्हणाले की नीट सांग 'हे पाणी कुठून आणलेस ते. हे पाणी साधे दिसत नाही, हे गंगाजल आहे. उगनाने ओळखले की आपण पकडलो गेलो. विद्यापतींनी आपल्याला ओळखले. त्याने सांगितले की मी 'शिव' आहे. तुझ्या भक्तीने वश होऊन सेवक म्हणून राहिलो. तुला पाण्यावाचून व्याकूळ झालेला पाहून मी जटेतून गंगाजल काढून दिले. मी तुझ्या भक्तीनें इतका मोहून गेलो आहे की, अजून काही दिवस तुझ्याजवळ राहण्याची माझी इच्छा आहे. पण ज्या दिवशी मी 'शिव' आहे हे कोणाला कळेल त्या दिवशी मी अदृश्य होईन.

उगना विद्यापतीकडे राहू लागला. एक दिवस विद्यापतीच्या बायकोने त्याला काम सांगितले. पण उगना दुसऱ्या कामात गुंतला असल्यामुळे त्याने ते लौकर केले नाही. विद्यापतीची बायको संता-

प ी आणि जवळचे लाकूड घेऊन मारायला धावली लांबूनच कोठून तरी विद्यापतींनी पाहिले. शंकरांनी घातलेली अट विसरून धावत येऊन विद्यापती बायकोला म्हणाले, "अग, थांब, थांब. प्रत्यक्ष शंकरावर प्रहार करत्येस!" त्या बिचारीला काय माहित की, उगना म्हणजे प्रत्यक्ष शंकरच आहेत. परिणाम मात्र असा झाला की शंकर अदृश्य झाले. शंकरांच्या विरहामुळे विद्यापतींना वेड्यासारखे झाले. ते अखंड शंकराचे नामस्मरण करू लागले.

शेवटी नामस्मरण करता करता त्यांना कळून आले की आपला मरणकाळ जवळ आला आहे. "मरणं जान्हवी तीरे" गंगेच्या काठी मरण यावे, असे शास्त्रात लिहिलंय आणि मिथिला देशातील लोकांची तशी श्रद्धा होती म्हणून शेवटी गंगेच्या दर्शनाला जायचे ठरविले. त्यांनी आपल्या मुलीला सांगितले की, तुझ्या आईला म्हणावे, "आपल्याला गंगास्नानासाठी जायचे आहे. प्रवासाची तयारी कर." कुलदेवतेला नमस्कार करून पालखीत बसून विद्यापती निघाले.

दरकूच दर मुक्काम करीत करीत ते "बरौनी" च्या जवळ 'बजितपूर' गावात आले. तिथे आल्यावर त्यांना कळले की, येथून दोन कोसांवर गंगा आहे. ते म्हणाले, "गंगेच्या दर्शनासाठी मी इतक्या लांब आलो गंगामाई माझ्यासाठी दोन कोस सुद्धा येणार नाही का? विद्यापतीं तिथेच थांबले आणि असे सांगतात की त्या रात्री गंगामाईला पूर आला आणि गंगेचा प्रवाह ज्या ठिकाणी विद्यापतीं होते तेथून वाहू लागला. दुसऱ्या दिवशी कार्तिक शुद्ध त्रयोदशीला विद्यापतींने गंगेच्या काठी देह ठेवला, अनेक राजांच्या आश्रयाला राहून जन्मभर शृंगाराची पदे रचणारा आणि शेवटी शिवाचा एकनिष्ठ व लाडका भक्त बनलेला हा कवी इ. स. १४४६ मध्ये शिवरूप झाला. ज्या ठिकाणी विद्यापतींनी देह ठेवला, त्या ठिकाणी शिवलिंगाची स्थापना केली. विद्यापतीनाथाचे मंदिर बांधले अजूनही तेथे गंगेच्या नवीन प्रवाहाच्या खुणा दृष्टीस पडतात.

● ● ●

त्याचप्रमाणे विद्यापतीकडे शंकर 'उगना' किंवा 'उदना'च्या रूपाने काम करीत असत. एके दिवशी उगनाला बरोबर घेऊन काही कामासाठी विद्यापती दुसऱ्या गावाला चालले होते. दुपारची वेळ होती. उन्हे रणरणत होती. विद्यापतींना अतिशय तहान लागली. आजुबाजूला दाट जंगल असल्याने जवळपास कोठेच पाणी सापडले नाही. त्यांनी उगनाला पाण्याच्या शोधासाठी पाठविले. उगनाने परत येऊन सांगितले की पाणी कुठेच नाही. विद्यापतींनी सांगितले, जा, पुन: जाऊन शोध. पांण्यावाचून माझे प्राण अगदी व्याकुळ झाले आहेत. जा, लौकर पाणी घेऊन ये. उगनाला विद्यापतींची अवस्था पाहून वाईट वाटले. तो पुन: पाणी आणण्यास गेला. थोड्याच वेळात उगना लोटाभर स्वच्छ पाणी घेऊन आला. विद्यापती पाणी प्याले. पाण्याची चव त्यांना गंगाजलासारखी लागली. पाणी प्याल्यावर त्यांची खात्री झाली की हे साधे पाणी नसून गंगाजलच आहे. त्यांनी उगनाला विचारले,हे पाणी तू कोठून आणलेस?' उगना म्हणाला, 'जवळच एक विहिर आहे, त्या विहिरीतून मी हे पाणी आणले. विद्यापती म्हणाले की नीट सांग 'हे पाणी कुठून आणलेस ते. हे पाणी साधे दिसत नाही, हे गंगाजल आहे. उगनाने ओळखले की आपण पकडलो गेलो. विद्यापतींनी आपल्याला ओळखले. त्याने सांगितले की मी 'शिव' आहे. तुझ्या भक्तीने वश होऊन सेवक म्हणून राहिलो. तुला पाण्यावाचून व्याकूळ झालेला पाहून मी जटेतून गंगाजल काढून दिले. मी तुझ्या भक्तीने इतका मोहून गेलो आहे की, अजून काही दिवस तुझ्याजवळ राहण्याची माझी इच्छा आहे. पण ज्या दिवशी मी 'शिव' आहे हे कोणाला कळेल त्या दिवशी मी अदृश्य होईन.

उगना विद्यापतीकडे राहू लागला. एक दिवस विद्यापतीच्या बायकोने त्याला काम सांगितले. पण उगना दुसऱ्या कामात गुंतला असल्यामुळे त्याने ते लौकर केले नाही. विद्यापतीची बायको संता-

प ी आणि जवळचे लाकूड घेऊन मारायला धावली लांबूनच कोठून तरी विद्यापतींनीं पाहिले. शंकरांनी घातलेली अट विसरून धावत येऊन विद्यापती बायकोला म्हणाले, "अग, थांब, थांब. प्रत्यक्ष शंकरावर प्रहार करत्येस!" त्या बिचारीला काय माहित की, उगना म्हणजे प्रत्यक्ष शंकरच आहेत. परिणाम मात्र असा झाला की शंकर अदृश्य झाले. शंकरांच्या विरहामुळे विद्यापतींना वेड्यासारखे झाले. ते अखंड शंकराचे नामस्मरण करू लागले.

शेवटी नामस्मरण करता करता त्यांना कळून आले की आपला मरणकाळ जवळ आला आहे. "मरणं जान्हवी तीरे" गंगेच्या काठी मरण यावे, असे शास्त्रात लिहिलंय आणि मिथिला देशातील लोकांची तशी श्रद्धा होती म्हणून शेवटी गंगेच्या दर्शनाला जायचे ठरविले. त्यांनी आपल्या मुलीला सांगितले की, तुझ्या आईला म्हणावे, "आपल्याला गंगास्नानासाठी जायचे आहे. प्रवासाची तयारी कर." कुलदेवतेला नमस्कार करून पालखीत बसून विद्यापती निघाले.

दरकूच दर मुक्काम करीत करीत ते "बरौनी" च्या जवळ 'बजितपूर' गावात आले. तिथे आल्यावर त्यांना कळले की, येथून दोन कोसांवर गंगा आहे. ते म्हणाले, "गंगेच्या दर्शनासाठी मी इतक्या लांब आलो गंगामाई माझ्यासाठी दोन कोस सुद्धा येणार नाही का? विद्यापतीं तिथेच थांबले आणि असे सांगतात की त्या रात्री गंगामाईला पूर आला आणि गंगेचा प्रवाह ज्या ठिकाणी विद्यापतीं होते तेथून वाहू लागला. दुसऱ्या दिवशी कार्तिक शुद्ध त्रयोदशीला विद्यापतीने गंगेच्या काठी देह ठेवला, अनेक राजांच्या आश्रयाला राहून जन्मभर शृंगाराची पदे रचणारा आणि शेवटी शिवाचा एकनिष्ठ व लाडका भक्त बनलेला हा कवी इ. स. १४४६ मध्ये शिवरूप झाला. ज्या ठिकाणी विद्यापतींनी देह ठेवला, त्या ठिकाणी शिवलिंगाची स्थापना केली. विद्यापतीनाथाचे मंदिर बांधले अजूनही तेथे गंगेच्या नवीन प्रवाहाच्या खुणा दृष्टीस पडतात.

● ● ●

# मुस्लिम सन्त कवी-रसखान



**मुस्लिम सन्त कवी**

संध्याकाळची वेळ होती. रस्त्याच्या कडेला काही वैष्णव गप्पा मारीत होते. अर्थात वैष्णव भक्तांच्या गप्पा कशाबद्दल असणार? श्रीकृष्णाच्या भक्तिविषयीच त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. एक वैष्णव म्हणाला, "श्रीकृष्णाची भक्ति करताना मन कृष्णावर जडले पाहिजे. रात्रंदिवस त्याचंच स्मरण झालं पाहिजे.'

दुसरा वैष्णव म्हणाला, ' बरोबर आहे. जसे रसखानाचे मन सावकाराच्या मुलावर जडले आहे, तसे भक्ताचे मन श्रीकृष्णावर जडले पाहिजे " आणि त्याच वेळी रसखान तेथून जात होता.

त्याने ही चर्चा ऐकली. आपले नाव ऐकून तो क्षणभर थांबला. त्याने वैष्णवांना विचारले की, तुम्ही माझे नाव का घेतले ?

वैष्णव म्हणाले, " रसखान, आम्ही तुझी निंदा करीत नव्हतो, उलट तुझे उदाहरण देऊन सांगत होतो की तुझे सावकाराच्या मुलावर जितके प्रेम आहे, तितके जर भक्ताने श्रीकृष्णावर केले तर तो या भवसागरातून उद्धरून जाईल. "

"कसा आहे तुमचा श्रीकृष्ण ?" रसखानाने विचारले. वैष्णवांनी श्रीकृष्णाचे चित्र दाखविले. श्रीकृष्णाचे स्वरूप पाहून रसखान थक्क झाले. कमरेला पीताम्बर नेसला होता. डोक्यावर मोर-पिसांचा मुकुट होता, गळयात वैजयंती माळ रूळत होती, शरीं-रावर निरनिराळे अलंकार घातले होते. ओठावर मुरली धारण केली होती. असे ते मुरली मनोहराचे स्वरूप पाहून रसखान मोहित झाले. सावकाराच्या मुलापेक्षा कितीतरी पटीने अधिक सुंदर आहे हा हिंदूंचा देव. सावकाराच्या मुलाचे सौंदर्य रसखानाला फिके वाटू लागले. मन अन्तर्मुख झाले. वैष्णवांचे शब्द कानात घुमू लागले. रसखान विचार करू लागले, " खरंच, श्रीकृष्णाच्या भक्तीने मी मुक्त होईन. "

रसखान हा मुस्लिम कृष्णभक्त कवि होता याचा जन्म स. १५९० मध्ये दिल्ली येथे झाला. याच्या काव्यातील उल्लेखांवरून याचा संबंध दिल्लीतील राजघराण्याशी असावा असा अंदाज आहे. पण जेव्हा राजघराण्याचे पतन झाले व दिल्ली ओसाड झाली तेव्हा स. १६१२ मध्ये रसखानाने दिल्ली सोडली व तो वृंदावनाला आला. त्याच्या काव्यात दिल्लीतील बंडाचा उल्लेख सांपडतो. पण त्याला ऐतिहासिक पुरावा सांपडत नाही.

दिल्लींत एक सावकार रहात होता. त्याचा मुलगा अतिशय सुंदर व देखणा होता. रसखानाचे त्याच्यावर प्रेम होते. त्याच्या

सौंदर्याने तो इतका वेडा झाला होता की, तो सारखा त्याच्या मागे मागे फिरत असे. त्याचे उष्टे खात असे. त्याच्याकडे नोकरी करीत असे, पण पगार घेत नसे. रात्रंदिवस त्याच्यावर आसक्त असे. त्याच्याशिवाय रसखानाला काही सुचत नसे. लोक त्याची टिंगल करीत, चेष्टा करीत. पण रसखान त्यांच्याकडे लक्ष देत नसे. म्हणून वैष्णवांनी कृष्णप्रेमाला रसखानाची उपमा दिली. पण त्यांच्या बोलण्याने रसखानाचे मन अन्तर्मुख झाले. त्यानें ठरविले की वृंदावनाला जाऊन चित्रातील स्वरूप प्रत्यक्ष पाहायचे त्याशिवाय अन्न ग्रहण करायचे नाही.

त्या रात्री रसखानाला झोप आली नाही. सतत श्रीकृष्णाचाच विचार चालला होता. सावकाराच्या पोरावरील प्रेमाची त्यालाच किळस वाटायला लागली. सकाळी घोड्यावर बसून रसखान वृंदावनला आले. वेष बदलून साऱ्या मंदिरात फिरले, पण दर्शन झाले नाही. दुसऱ्या दिवशी वेष बदलून गोपाळपुरात गेले. तेथें एका माणसाने त्यांना ओळखले व एक मुस्लिम हिंदूंच्या देवळात येतो म्हणून त्याला धक्के, मारून बाहेर काढले. रसखान अत्यंत निराश झाले. निराश मनानेच ते बाहेर गोविंद कुण्डावर बसून राहिले. इतक्या लांबून श्रीकृष्णाच्या दर्शनासाठी आलेले, पण दर्शन झाले नाही. मन बेचैन झाले. मनाची तळमळ शान्त झाली नाही. तीन दिवस अन्न नाही, पाणी नाही. तेथेच उपाशी पडून राहिले. तोंडाने श्रीकृष्णाचे अखण्ड नामस्मरण चालले होते. शेवटी श्रीकृष्णानें ओळखले की हा खरा भक्त आहे. सात्विक मनाचा आहे. श्रीनाथांनी, श्रीकृष्णांनी त्याला दर्शन दिले. श्रीनाथाचे ते अलौकिक व सुंदर रूप पाहून रसखान आनंदाने नाचू लागले. मनाची तळमळ पूर्णपणे शान्त झाली. पण श्रीनाथांना पकडायला म्हणून रसखान धावले. पण इतक्यात श्रीनाथ अदृश्य झाले.

त्यावेळी वृंदावनला वल्लभाचार्यांचे चिरंजीव गादीवर बसले होते. विठुलनाथ वल्लभ संप्रदायाचे आचार्य होते. श्रीनाथानी विठलनाथांना सांगितले की हा सात्विक जीव आहे. पण मुसलमान जातीत जन्मला आहे. त्याच्यावर कृपा कर. एका मुसलमानाला आपल्या सांप्रदायात घ्यायचे म्हणून विठ्ठलनाथ नाराज झाले पण श्रीनाथांनी स्पष्ट बजावले की, जोपर्यंत तू याचा अंगीकार करणार नाहीस तोपर्यंत मी तुझ्या हातचे अन्न ग्रहण करणार नाही. नाईलाजाने विठ्ठलनाथ गोविंद कुंडावर आले व त्यांनी रसखानाला दीक्षा दिली. विठ्ठलनाथांच्या रूपाने त्याला श्रीकृष्णाचेच दर्शन झाले. विठ्ठनाथ त्याला बरोबर घेऊन आले. मंदिरातील श्रीनाथांच्या मूर्तीचे दर्शन झाले. महाप्रसाद झाला. तेव्हापासून रसखान श्रीनाथांच्या रूपावर आसक्त झाले. रसखान कीर्तन करीत. नंतर त्यांनी अनेक कविता केल्या, दोहे रचले. जशा जशा कृष्णाच्या लीला पहायला मिळाल्या तसे तसे त्या लीलांचे त्यांनी वर्णन केले. रसखान विठ्ठल नाथांचे आवडते शिष्य झाले. अशा रीतीनें रसखान सावकाराच्या मुलाच्या प्रेमा कडून श्रीकृष्ण प्रेमाकडे वळले. लौकिक प्रेमाकडून अलौकिक प्रेमाकडे आले, श्रीकृष्णाच्या सौंदर्याचे वर्णन करून खरोखरच रसांचीं खाण झाले.

रसखान हिन्दूप्रमाणे वागत असत. ते गळयात अनेक माळा घालीत. कपाळाला टिळा लावीत. त्याचे हे हिन्दूप्रमाणे वागणे पाहून मुसलमान चिडले. त्यांनी बादशहाकडे तक्रार केली. बादशहाही रसखानावर चिडलाच होता. त्यानें रसखानाची जहागिरी जप्त केली. त्याचा खूप छळ केला. पण त्यांचे मन कृष्णभक्तिपासून विचलित झाले नाही. एकदा बादशहाने त्याला दरबारात बोलावून विचारले की, तू हिन्दूप्रमाणे गळयात माळा कां घालतोस ? रसखानाने बादशहाला मोठे मार्मिक उत्तर दिले. तो

म्हणाला, " महाराज लाकडांच्या नावेवर दगड तरतो म्हणून या माळा घातल्या आहेत. माझ्यासारख्या दगडाला भवसागरातून पार करण्यासाठी या नावा आहेत." बादशहा म्हणाला की, 'ठीक आहे. तुला माळ घालायची असेल तर एक माळ घाल. पण इतक्या माळा कशासाठी घातल्यास ? हिन्दूसुद्धा इतक्या माळा घालीत नाहीत. रसखान म्हणाला," महाराज ते हलके दगड आहेत त्यांना अेक माळ पुरते. पण मी जड दगड आहे."

असे सांगतात की वृंदावनला यायच्या आधी रसखान खूप भटकले. स. १६३४ ते १६३७ च्या तीन वर्षात त्यांनी यमुना नदीच्या किनारी राम कथेचे श्रवण केले. 'रामचरित मानस' अैकले. कृष्णभक्त असूनही ते उदार होते. राम, शिव, गंगा यांचे महात्म्यही त्यांनी गायले.

त्यांच्या बाबतीत आणखी एक दन्तकथा प्रसिद्ध आहे. एकदा रसखान काबाच्या यात्रेला चालले होते. वाटेत वृंदावनाला उतरले. वृन्दावनात श्रीकृष्णाची मूर्ति पाहिली. डोक्यावर मोरपिसांचा मुकुट होता. गळयात वनमाला घातली होती. प्रत्येक अंगावर अलंकार होते. भरजरीचे कपडे घातले होते. एका हातात मुरली होती. ते रूप पाहून पूर्व पुण्याईने रसखानाची भक्ति जागृत झाली. ते सौंदर्य पाहून रसखान बेहोश झाले. बाकीच्या यात्रेकरूना वाटले की हे मूर्च्छित पडले. त्यांनी रसखानाला जागे केले. ते म्हणाले, " रसखान, उठा, डोळे उघडा, काबाला चला." रसखान म्हणाले की, आता कुठलं 'काबा' अन कुठलं काय ? आता डोळे उघडून तरी मी काय करू ? डोळे मिटूनच मी हे सौंदर्य पहात राहाणार. आता मी येथेच राहाणार. मला जर पुनः मनुष्याचा जन्म मिळाला तर मी वृंदावनातील गोप होईन. मला जर पशूचा जन्म मिळाला तर मी नंदाघरची गाय होईन. दगडाचा जन्म मिळाला तर मी

त्या पर्वतावरचा दगड होईन की जो पर्वत भगवान् श्रीकृष्णांनी आपल्या करांगुलीवर धारण केला होता. जर मला पक्ष्याचा जन्म मिळाला, तर यमुना किनारी असलेल्या कदंब वृक्षावरील पक्षी होईन. त्याची ही अवस्था पाहून बाकीच्या यात्रेकरूंना आश्चर्य वाटले. त्यांनी त्याला जबरदस्तीने रथात घालून नेण्याचे ठर-विले पण रसखान पळून गेले. पुढे वृंदावनात राहून त्यांनी कृष्ण-लीलेवर पदे रचली

असे हे रसखान श्रीकृष्णाचे अेकनिष्ठ भक्त होते. हिंदूपेक्षाही त्यांच्या प्रेमाची तीव्रता अधिक होती. जन्मभर वृंदावनात राहिले, श्रीकृष्णाची सेवा केली, त्याच्या लीला गायल्या. श्रीकृष्णाच्या सेवेतच ते शरीराची सार्थकता समजतात रसखान म्हणतात कीं वाणी तीच श्रेष्ठ की, जी श्रीकृष्णाचे गुणगान करते. कान ते श्रेष्ठ की जे नित्य हरिकथा अेकतात. हाताचे सार्थक श्रीकृष्णाची सेवा करण्यात आहे, यावरून रसखानाची श्रीकृष्णाकरील आत्यंतिक भक्ति दिसून येते.

त्यांनी आपल्या काव्यात गोपींच्या मनाचे सूक्ष्म चित्रण केले आहे. मुरलीमुळे श्रीकृष्णाच्या सहवासाचे सुख मिळत नाही म्हणून गोपींच्या मनात मुरलीबद्दल सवती मत्सर असतो. कृष्ण मथुरेला गेल्यावर मन रिझवण्यासाठी एक गोपीश्रीकृष्ण बनते. ती म्हणतें, " मी श्रीकृष्णासारखा पीताम्बर नेसेन, मोरमुकुट धारण करीन. पण त्या श्रीकृष्णाने ओठावर ठेवलेली मुरली धारण करणार नाही.

" या मुरली मुरलीधरकी अधरान धरी, अधरा न धरौंगी ।

दुसरी एक गोपी आपली दुर्बलता प्रकट करते. ती म्हणते की, मी नेहमी ठरवते की श्रीकृष्णाची मुरली ऐकायचीं नाही. मी कानात बोटे घालून गच्चीवर उभी राहते. खालून तो मनमोहन

जातो, माझ्याकडे पाहतो आणि असा काही गोड हसतो की माझा माझ्यावर ताबा राहात नाही. मी त्याच्यासाठी वेडी होते.

अशी कित्येक रसपूर्ण पदे रसखानाने रचली आहेत आणि अक्षरशः रसखान म्हणजे रसाची खाण आहेत. रसखानाची भक्ति आणि हिन्दी सेवा पाहून भारतेन्दु हरिश्चंद्र म्हणतात.

" इन मुसलमान हरिजन न पै, कोटिन हिन्दू बारिये ।

या रसिक मुसलमान कृष्णभक्तावरून कोटयवधी हिन्दु ओवाळून टाकावेत. इतकी याची योग्यता, असा हा रससिद्ध कवि ८५ वर्षे जगला. सं. १६७५ मध्ये याने देह ठेवला. आजही मथुरेपासून सहा मैलावर याची समाधि दाखवली जाते.

३०२ दिनांक ......
किशोर क्र. . .९८९..
BVBK-0400202